दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ शुक्रवार, दि.२१ मार्च २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १५९ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा दौरा कार्यक्रम

वर्धा : राज्याचे गृह निर्माण, गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर दि. २१ मार्च रोजी जिल्ह्याच्या दौ-यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम असा आहे. दि. २१ मार्च रोजी रात्री ९.४० वाजता नागपूर येथून वर्धेकडे प्रयाण करतील रात्री १०.५० वाजता वर्धा येथे आगमन व मुक्काम. दि. २२ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी १२ वाजता प्रशासकीय कामाकरीता राखीव. दुपारी १ वाजता सर्कस ग्राऊंड येथे आयोजित वर्धिनी महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी २ ते ४ प्रशासकीय कामाकरीता राखीव. सायंकाळी ६ वाजता स्वावलंबी मैदान येथे आयोजित वर्धा जिल्हा पोलीस कल्याण निधीकरीता स्वरतंरग या कार्यक्रमास उपस्थिती. दि. २३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता इंद्रप्रस्थ न्यू आर्ट, सायन्स ॲन्ड कामर्स कॉलेज येथे आयोजित युथ पार्लमेन्ट कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १० वाजता वर्धा येथून हिंगणघाट कडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हिंगणघाट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसराचे सौदर्यीकरणाच्या कामाची पाहणी करतील. दुपारी १२ वाजता हिंगणघाट येथील मनोहर तुकाराम ढोमणे ज्वेलर्स यांच्या चौथ्या शाखेच्या शुभारंभ कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १ वाजता हिंगणघाट येथून वर्धेकडे प्रयाण करतील. दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत प्रशासकीय कामाकरीता राखीव. सायंकाळी ४ वाजता वर्धा येथून नागपूर कडे प्रयाण करतील.

मायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशनकडून महाराष्ट्राच्या डिजिटल गव्हर्नन्सच्या मॉडेलला सहकार्य

बिल गेट्स यांची ग्वाही; लखपती दीदी उपक्रमातही सहभाग ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बिल गेट्स यांच्यादरम्यान चर्चा

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यातील शासकीय कामामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यास सुरूवात झाली आहे. या डिजिटल गव्हर्नन्स आणि राईट टू सर्विसमध्ये महाराष्ट्राला देशात मॉडेल करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशनकडून सहकार्य दिले जाईल. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महिला स्वयंरोजगाराच्या २५ लाख लखपती दिदींच्या उद्दिष्टपूर्तीसाठी या उपक्रमात सहभाग घेवून महिलांना उद्योजक बनविण्यात गेट्स फाऊंडेशनने भागीदारी घेण्याची तयारी दर्शवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक, प्रख्यात उद्योजक आणि गेट्स फाऊंडेशनचे बिल गेट्स यांच्यात सकारात्मक चर्चा झाली.

मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स तसेच गेट्स फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी श्री. गेट्स आणि मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यादरम्यान आरोग्य, कृषी आणि पायाभूत सुविधांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत सकारात्मक चर्चा झाली.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री आणि बिल गेट्स यांची पहिल्यांदाच भेट होत असून याचा आनंद असल्याचे सांगून श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र परिवर्तन टप्प्यातून जात असल्याने पायाभूत सुविधा, कृषी, आरोग्यामध्ये मोठे प्रकल्प सुरू आहेत. ग्रामीण भागात डॉक्टरांची कमतरता असल्याने दर्जेदार आरोग्य सेवा-सुविधा देण्यासाठी गेट्स फाऊंडेशने सहकार्य करावे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आरोग्य आणि कृषी क्षेत्रामध्ये करण्यासाठी अर्थसंकल्पातही तरतूद केली आहे. पुणे जिल्ह्यात एआयच्या वापरातून ऊसाचे दुप्पट उत्पादन घेतल्याचे उदाहरणही मुख्यमंत्र्यांनी दिले.

शेतकऱ्यांना २४ तास वीज देण्यासाठी सोलरचा वापर

शेतकऱ्यांना दिवसाही वीज उपलब्ध होण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून यासाठी २०२२-२३ पासून सोलरचा वापर करण्यात येत आहे. ३० टक्के वीज निर्मितीमधून आता ५२ टक्क्यांपर्यंत सोलरमधून वीजनिर्मिती होत असल्याने शेतकऱ्यांना कमी खर्चात वीज उपलब्ध होत आहे. त्यांना २४ तास वीज देण्यासाठी विजेचे सर्व फिडर सोलरद्वारे करण्याचे नियोजन असल्याची माहितीही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी बिल गेट्स यांना दिली.

नवी मुंबई येथे ३०० एकर परिसरात इनोव्हेशन सिटी करण्यात येत असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. यावर श्री. गेटस यांनी इनोव्हेशन सिटी आणि इतर उपक्रमासाठी आर्थिक बाबीसोबत तांत्रिक मदतीत भागीदारी करण्याची ग्वाही दिली.

मलेरियामुक्त महाराष्ट्रासाठी प्रयत्न

महाराष्ट्रात डासांमुळे मलेरिया आजाराच्या रूग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मलेरियामुक्त महाराष्ट्र करण्यासोबतच डेंग्यू नियंत्रणासाठी गेट्स फाऊंडेशन प्रयत्नशील आहे. यासाठीही तांत्रिक, आर्थिक मदत करण्यात येणार असून गडचिरोली जिल्ह्यापासून याची सुरूवात करण्यात येणार असल्याची ग्वाही बिल गेट्स यांनी दिली.

२५ लाख लखपती दीदीसाठीही भागीदारी

क्रिस्पर केस नाईन आणि दुग्ध उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मायक्रोसॉफ्ट प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र राज्यातील गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविकेच्या माध्यमातून गरिबीतून बाहेर काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानासाठी भागीदारी करणार आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महिला सबलीकरण आणि स्वयंरोजगारासाठी २५ लाख महिला लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट निश्चित केल्याचे सांगितले, शिवाय गरीब आणि गरजू महिलांना राज्य शासन महिन्याला मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतून १५०० रूपये देत असल्याची माहिती दिली. या उपक्रमातही सहभाग घेण्यास मायक्रोसॉफ्ट आणि गेट्स फाऊंडेशन तयार असल्याचेही बिल गेट्स यांनी सांगितले. महिलांचे संपूर्ण आर्थिक व्यवहार डिजिटल करण्यासाठी सहकार्य करण्याची गेट्स यांनी तयारी दर्शवली.

शाश्वत ऊर्जेसाठी भागीदारी घेणार

महाराष्ट्रातविविध सामाजिक संस्था, शासकीय संस्था, कंपन्यांच्या सहकार्याने शाश्वत ऊर्जेसाठी भागीदारी घेणार असून याचा शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याचेही श्री. गेट्स यांनी सांगितले. महाराष्ट्रात मोठी क्षमता असल्याने महाराष्ट्राचे विकासाचे मॉडेल जगभर नेण्यास प्रयत्न करण्याची ग्वाही श्री. गेट्स यांनी दिली.

बिलगेट्स यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना सियाटल भेटीसाठी आमंत्रण दिले. या भेटीप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ श्रीकर परदेशी, गेट्स फाउंडेशनचे भारतातील संचालक हरी मेनन, गेट्स फाऊंडेशनच्या जागतिक मलेरिया प्रकल्पाचे संचालक फिलिप वेलकॉफ, आरोग्य सल्लागार डॉ. आनंद बंग आदी उपस्थित होते.

परवानगीच्या हद्दीबाहेर वाळू उपसा केल्यास दंडात्मक कारवाई : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये वाळू उपशाच्या ठिकाणी पाहणी मोहीम राबविण्यात येईल. परवानगीपेक्षा जास्त प्रमाणात किंवा ठरवलेल्या हद्दीबाहेर वाळू उपसा केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य प्रशांत ठाकूर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य जयंत पाटील, अमित देशमुख, रणधीर सावरकर, प्रशांत बंब, अस्लम शेख, विश्वजीत कदम, आशिष देशमुख, हेमंत ओगले यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, लवकरच नवीन वाळू धोरण आणले जाणार असून हे वाळू धोरण विविध राज्यातील वाळू धोरणांचा अभ्यास करून तयार करण्यात आले आहे. प्रतिक्रियांसाठी हे धोरण सार्वजनिक करण्यात आल्यानंतर त्यावर २८५ पेक्षा जास्त सूचना आल्या आहेत. राज्यामध्ये मागणीवर आधारित वाळूचा पुरवठा करण्यात येणार आहे. पुढच्या दोन वर्षामध्ये नदीतून नाही तर दगड खाणीवरून एम सँण्ड तयार करण्यात येईल. त्यामध्ये दगड खाणींमधून येणाऱ्या वाळूसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्टोन क्रशरसाठी प्रोत्साहन देत आहोत. त्या माध्यमातून दगडापासून मोठ्या प्रमाणात वाळू तयार होणार असून, त्यामुळे नदीतील वाळूची मागणी कमी होईल. तसेच येत्या दोन वर्षांत वाळूची मागणी आणि पुरवठा यामध्ये जी काही तफावत आहे ती दूर होईल, असेही मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, घरकुल बांधणाऱ्यांसाठी आता मोफत वाळू देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कोकणात सेक्शन पंपाद्वारे प्रचंड प्रमाणात सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खनन होणाऱ्या सर्व सक्शन पंपावर कारवाई करण्याचे आदेश कोकण आयुक्तांना दिले आहेत. यानंतरही वाळू उत्खनन सुरू राहिल्याचे निदर्शनास आले तर संबंधित तहसीलदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असे मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

खासगी ट्रॅव्हल्सच्या बस प्रवासामध्ये ३४ लाखांच्या दागिन्यांची चोरी

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : डोंबविली येथील सराफ कारागिराकडील तब्बल ३४ लाख रुपयांचे दागिने खासगी ट्रॅव्हल्सच्या बसमधून प्रवास करताना दोन चोरट्यांनी चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विजापूर ते मुंबई प्रवास करताना ही घटना घडली असून, पाठीमागच्या आसनावर बसलेल्या दोघांनी ते चोरल्याचा संशय आहे. याप्रकरणी भेहराराम कुमावत (वय ४४, रा. डोंबिवली ईस्ट) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भेहराराम कुमावत हे डोंबिवली ईस्ट परिसरात सराफी कारागीर म्हणून काम करतात. येथे दागिने तयार केल्यानंतर ते विजापूर येथील काही सराफांना विक्री करतात. गेल्या दीड वर्षांपासून ते हा व्यवसाय करतात. दरम्यान, ते दागिने घेऊन विजापूर येथे गेले होते. काही दागिन्यांची विक्री केली. उर्वरित ३३ लाख ५० हजार रुपये किमतीचे दागिने आणि १ लाख १२ हजार रुपयांची रोकड घेऊन ते विजापूरहून खासगी ट्रॅव्हल्सच्या बसने मुंबईकडे परतत होते.

बसमध्ये त्यांच्या पाठीमागील आसनावर दोन व्यक्ती बसल्या होत्या. बस हडपसर टोल नाक्याजवळील द्राक्ष संशोधन केंद्राजवळ आल्यानंतर लघुशंकेसाठी थांबविण्यात आली होती. तेव्हा काही प्रवाशांसमवेत तक्रारदार खाली उतरले होते. ते परत आले, तेव्हा त्यांना बॅगेतील दागिने आणि रोकड चोरून नेल्याचे लक्षात आले. मुंबईला गेल्यानंतर त्यांनी संबंधित सराफाला याची माहिती दिली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांनी हडपसर पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांना प्रथम तक्रारीत तथ्य आढळले नव्हते. परंतु, पोलिसांनी प्राथमिक चौकशी केली. तेव्हा पाठीमागे बसलेले पॅसेंजर द्राक्ष केंद्रापासूनच गायब झाल्याचे लक्षात आले. तसेच, त्यांचे मोबाईल देखील घटनेनंतर बंद झाल्याचे तांत्रिक तपासातून समोर आले आहे. आता पोलीस त्या दोघांचा शोध घेत आहेत.

द्राक्ष शेतावरील प्लास्टिक आवरणावर अनुदान देण्यास शासन सकारात्मक : मंत्री दादाजी भुसे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : द्राक्ष फळ पीके संवेदनशील आहे. अवकाळी पाऊस, गारपीट तसेच वादळ वारा यामुळे द्राक्ष फळ पिकाचे नुकसान मोठ्या प्रमाणावर होते. द्राक्ष फळ पिकाच्या शेतीवर प्लास्टिक आवरण असल्यास होणारे नुकसान टाळता येऊ शकते. यासाठी शासन प्लास्टिक आवरणासाठी अनुदान देण्यास सकारात्मक आहे, असे मंत्री दादाजी भुसे यांनी आज विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

द्राक्ष उत्पादकांच्या समस्या बाबत सदस्य रोहित पवार यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य जयंत पाटील, दिलीप बनकर, विश्वजीत कदम यांनीही सहभाग घेतला.

मंत्री भुसे म्हणाले, शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन काही व्यापारी द्राक्ष माल खरेदी करतात. मात्र काही प्रकरणात शेतकऱ्यांना पैसे न दिल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यास अशा प्रकरणात पोलीस कारवाई करण्यात येते. जुलै ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादकांचे झालेल्या नुकसानीपोटी १९३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच नोव्हेंबर ते डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या नुकसानीपोटी ९६ लक्ष रुपये नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. सांगली जिल्ह्यातही या कालावधीत झालेल्या नुकसानीपोटी ८०५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ही मदत जमा करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करण्यात येणार आहे.

शासन कोरडवाहू शेतीचे नुकसान झाल्यास प्रति हेक्टरी १३ हजार ६००, बागायती २७ हजार ५०० आणि फळबाग नुकसानीपोटी ३६ हजार रुपये नुकसान भरपाई देते. या नियमानुसार फळबाग नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल, असेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

नदीमध्ये अडकलेल्या एका तरुणाला वाचविण्यात अग्निशामक दलाच्या जवानांना यश

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : पुणे शहरातील मुंढवा येथील पुलाखाली नदीमध्ये एक तरुण अडकल्याची घटना घडली. या घटनेतील तरुणाला सुखरूप बाहेर काढण्यात अग्निशामक दलाच्या जवानांना यश आले आहे.

अग्निशामक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंढवा येथील पुलाखाली नदी मध्ये आज सकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास एक तरुण नदीच्या मधोमध अडकला होता. याबाबतची माहिती अग्निशामक विभागास प्राप्त झाल्यानंतर घटनास्थळी पोहोचताच जवानांना नदीच्या मधोमध एक तरुण पाण्यात अडकलेला आणि बाहेर येण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले.

जवानांनी तातडीने रश्शी, लाईफ जॅकेट, लाईफ रिंगच्या साह्याने पाण्यात उतरत, त्या तरुणाजवळ जाऊन त्याला धीर देत त्याच्याशी संवाद साधला आणि त्याला अवघ्या पंधरा मिनिटातच सुखरुप पाण्याबाहेर काढले. तिथे उपस्थित त्याच्या आई वडिलांच्या स्वाधीन त्याला करण्यात आले असून तो तरुण तिथे कसा पोहोचला ही माहिती मिळू शकली नसल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात यंदाच्या वर्षी ४४ लाख क्विंटल कापसाची खरेदी : पणन मंत्री जयकुमार रावल

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यात यंदाच्या वर्षी १८ मार्च २०२५ रोजीपर्यंत सीसीआय म्हणजेच कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून ४४ लाख क्विंटल कापसाची खरेदी पूर्ण झाल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य अभिजीत वंजारी यांनी अल्पकालीन चर्चेदरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री रावल बोलत होते. यावेळी सदस्य सदाभाऊ खोत, अमोल मिटकरी, परिणय फुके, अरुण लाड यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून राज्यात कापूस खरेदी केंद्र उघडण्यात येतात आणि त्यांच्याकडूनच कापसाची खरेदी केली जाते असे सांगून मंत्री रावल म्हणाले की, यंदा कापसाला लांब धाग्यासाठी ७ हजार ५२१ रुपये तर मध्यम धाग्यासाठी ७ हजार १२१ रुपये हमीभाव देण्यात येत आहे. कापूस खरेदीसाठी राज्यात १२४ खरेदी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. कापूस खरेदीनंतर त्याच्या जिनींग आणि प्रेसिंगची प्रक्रिया केली जाते. त्यासाठी सप्टेंबर ते सप्टेंबर असा करार प्रेसिंगवाल्यांसोबत केलेले असतात. त्यामुळे कापूस खरेदी बंद नसल्याचे मंत्री रावल यांनी स्पष्ट केले.

सोयाबीन संदर्भात बोलताना मंत्री रावल म्हणाले की, जवळपास ११ लाख २१ हजार टन सोयाबीन यंदा खरेदी करण्यात आले आहे. त्याशिवाय तूर, मुग, उडीद, हरभरा या पिकांचीही खरेदी हमीभावाने होत आहे. या पिकांनाही चांगला हमीभाव देण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी शासन कायमच प्रयत्नशील असून राज्यात सिंचन क्षमतेत वाढ करण्यात येत आहे. सिंचनाच्या चांगल्या सोयी निर्माण झाल्या पाहिजेत. तसेच खासगी बाजार समित्यांच्या बाबत धोरण राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची माहितीही मंत्री रावल यांनी सभागृहात दिली.

ई-रक्तकोषद्वारे गरजू रुग्णांना मिळणार रक्त उपलब्धतेची माहिती : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यातील गरजू रुग्णांना दैनंदिन रक्तसाठा, रक्तदान शिबीरे तसेच इतर बाबींची माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी केंद्र शासनाने www.eraktkosh.mohfw.gov.in हे संकेतस्थळ विकसित केले असून या पोर्टलवर सर्व रक्त केंद्रामार्फत माहिती अद्ययावत करण्यात येते. त्यामुळे ई-रक्तकोष पोर्टलच्या माध्यमातून गरजू रुग्णांना रक्त उपलब्धतेची माहिती वेळेत मिळणार आहे. गरजू रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात राज्य रक्त संक्रमण परिषद संचलित जे. जे. महानगर रक्तकेंद्र यांच्यावतीने स्वैच्छिक रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. त्यावेळी आरोग्य मंत्री श्री. आबिटकर बोलत होते. यावेळी आरोग्य सेवा संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन आंबाडेकर, राज्य रक्त संक्रमण परिषदेचे सहायक संचालक महेंद्र केंद्रे, सर जे.जे. महानगर रक्तकेंद्राचे वैद्यकीय संचालक डॉ. हितेश पगारे यांच्यासह संबंधित डॉक्टर्स व रक्तदाते उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, रक्ताशी निगडीत थॅलेसिमिया, हिमोफिलीया, सिकलसेल व इतर आजारांच्या गरजू रुग्णांना रक्तासाठी धावपळ करावी लागू नये यासाठी रक्त उपलब्धतेविषयक अनुषंगिक माहिती www.eraktkosh.mohfw.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या वतीने आणि ई-रक्तकोष संकेतस्थळाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मोफत व तात्काळ रक्त उपलब्ध होण्यासाठी सहाय्य होणार आहे. सर्व नागरिकांनी या ई-रक्तकोष या संकेतस्थळाचा उपयोग करून जास्तीत जास्त रुग्णांना मोफत आणि तात्काळ रक्त उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी केले.

राज्यामध्ये शासकीय, निमशासकीय, सामाजिक संस्था, कार्पोरेशन, खासगी अशा एकूण ३९५ रक्तपेढ्यांचे/रक्तकेंद्र आहेत. वारंवार रक्ताची गरज असणारे थॅलेसेमिया, सिकलसेल, हिमोफिलिया, कॅन्सर या रुग्णांसोबतच मोठ्या शस्त्रक्रियांच्या वेळी उपचार करणाऱ्या डॉक्टरांना देखील वेळेत रक्त उपलब्ध करून देणे सोयीचे होणार आहे. तसेच या संकेतस्थळाद्वारे रक्तदात्यांना जवळचे रक्त केंद्र रक्तपेढी, रक्त शिबिराची माहिती सहज उपलब्ध होणार आहे. राज्यात सुरक्षित रक्ताचा पुरेसा साठा योग्य दरात उपलब्ध होणे यासाठी राज्य रक्त संकलन परिषद नियमित कार्यरत आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालये, सामाजिक संस्था, कार्पोरेट ऑफिसेस इत्यादींच्या माध्यमातून तसेच वारंवार रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांच्या मार्फत मोठ्या प्रमाणात रक्त संकलन करण्यात येते. 'रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान' या संकल्पनेतून नागरिकांना मोठ्या प्रमाणात रक्तदान करण्याचे आवाहन मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे.

गो हत्येचा वारंवार गुन्हा करणाऱ्यांवर कारवाई करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : कायद्यानुसार गो हत्या करणे गुन्हा आहे. मात्र गो हत्तेचा वारंवार गुन्हा केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. वारंवार अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांवर संघटित गुन्हेगारी कायद्यानुसार यापुढे कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिला.

श्रीगोंदा येथील कायदा सुव्यवस्थेच्या बाबत सदस्य संग्राम जगताप यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे २ नोव्हेंबर २०२४ रोजी दोन समाजामध्ये वाद झाला. या वादाचे नंतर मारहाणीत रूपांतर झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. तसेच मारहाणीत जखमींना पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले. दुर्दैवाने अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल केलेल्या एका इसमाचा यात मृत्यू झाला. पोलिसांनी यामध्ये कुठल्याही प्रकारची दिरंगाई केल्याचे दिसून येत नाही.

या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत गुन्हेगाराला अटकही केली. मात्र न्यायालयातून जामिनावर त्याची सुटका झाली. श्रीगोंदा शहरातील प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करण्यात येऊन कोणालाही सोडण्यात येणार नाही, असेही गृह राज्यमंत्री भोयर यांनी सांगितले.

संपादकीय...

विनाशकालाचे विपरीत...

हमासचा समूळ नायनाट हे इस्त्रायली पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहूंचे प्रमुख उद्दिष्ट; पण त्यानंतर गाझा पट्टीवर नियंत्रण कोणाचे हवे याचे उत्तर ते देत नाहीत. गाझामध्ये हमासशी दोन महिने जणू बळजबरीने युद्धविराम करावा लागलेल्या इस्त्रायलने अखेरीस मंगळवारी आपले खरे रंग दाखवलेच! सोमवार मध्यरात्रीनंतर गाझातील तीन ठिकाणांवर इस्त्रायली लढाऊ विमानांनी आग ओकली नि त्यात ४०० हून अधिक जीव भस्मसात झाले किंवा ढिगाऱ्याखाली गाडले गेले. इतक्या मोठ्या प्रमाणात दोन महिन्यांपूर्वी हल्ले झाले असते, तर आश्चर्य वाटण्यासारखे काही नव्हते. पण दरम्यानच्या काळात इस्त्रायल आणि हमास यांच्यात तात्पुरता शस्त्रविराम झाला. त्या वेळी ओलीस आणि कैद्यांची देवाणघेवाण होण्याबरोबरच कायमस्वरूपी शांततेवर चर्चा सुरू झाली होती. ही चर्चा अनिर्णित होती. पण मोडलेली नव्हती. तिचा निकाल लागण्याआधीच इस्त्रायलने नव्याने हवाई हल्ले सुरू करून पुन्हा एकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण करणे ही बाब, इस्त्रायली नेतृत्वाच्या हेतूंविषयीचा संदेह अधोरेखित करते. गाझा पट्टीतून हमासचा समूळ नायनाट करणे हे इस्त्रायली पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहूंचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पण दर एका हमास नेत्याचा निःपात करण्यासाठी १०० ते २०० पॅलेस्टिनींना ठार करण्याचे कारण काय, याचे उत्तर देण्याच्या फंदात ते कधी पडत नाहीत. गाझा पट्टीवर हमासचे नियंत्रण नको मग कोणाचे हवे? कारण पॅलेस्टिनी प्राधिकरण म्हणून जी व्यवस्था आहे ती अतिशय क्षीण आहे. शिवाय तिचे अस्तित्व आणि प्रभाव पश्चिम किनारपट्टीपुरता मर्यादित आहे. हे दोन वेगवेगळे भूभाग. या दुभंगलेल्या पॅलेस्टाइनच्या मधोमध आहे इस्त्रायल! पॅलेस्टाइनच्या राजकीय शासकांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊनच अतिरेकी मानसिकतेच्या हमासने गाझा पट्टी या भूभागावर नियंत्रण मिळवले. म्हणजे म्हणायला गेल्यास हमास हे गाझाचे शासक, पण प्रशासक नव्हेत! त्यामुळे पश्चिम किनारपट्टीपेक्षा गाझामध्ये अधिक बजबजपुरी होती. शहाणपण आणि सुव्यवस्थेचा अभावच. याचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न इस्त्रायलने केला, तेव्हा हमासला (आणि इस्त्रायललाही) समजणाऱ्या एकाच भाषेत प्रत्युत्तर दिले गेले. त्याची जबर किंमत आता हमासबरोबर गाझावासीयांनाही मोजावी लागत आहे. त्यात पुन्हा गाझातील अनिकेत, अश्रापांचे दुर्दैव असे, की इस्त्रायलला डोळे वटारून दटावणारे नेतृत्व वॉशिंग्टनमध्येही राहिलेले नाही. अध्यक्षीय निवडणुकीत जो बायडेन यांच्या नेतृत्वाखालील डेमोक्रॅटिक पक्षाच्या पराभवाने अमेरिकेचे किती नुकसान झाले, हे ज्यांचे-त्यांनी ठरवावे. पण या सत्तापालटाने गाझातील पॅलेस्टिनींचे नुकसान मोजदादीपलीकडचे असेल, याची चुणूकच ताज्या घटनेने मिळाली. कारण नेतान्याहूंना गाझातील हमासला संपवायचे आहे, तर अमेरिकेचे महामहीम डोनाल्ड ट्रम्प यांना पॅलेस्टिनींचे गाझातून समूळ विस्थापनच अपेक्षित आहे! दोन्हींचा हेतू जवळपास सारखाच, मार्ग वेगवेगळे. गाझात ट्रम्पबाबांना आपल्या स्वप्नातील पर्यटन नंदनवन वसवायचे आहे. त्यासाठी 'साफसफाई'चे काम बहुधा नेतान्याहू करत असावेत. गावचा पाटील ज्याप्रमाणे एखाद्या जमिनीच्या तुकड्यावर अवैध ताबा मिळवण्यासाठी पदरी पाळलेल्या गुंडांना धाडतो, तसेच हे.पॅलेस्टिनींच्या जीविताची नेतान्याहूंना पर्वा नाही नि त्यांच्या हक्कांची ट्रम्पना. चारशेहून अधिक बळी - ज्यांत मोठ्या संख्येने लहान मुले होती - गेल्याच्या बातमीवर व्हाइट हाऊसची प्रतिक्रिया होतीष्ठ 'यास हमास जबाबदार आहे. असे काही होऊ नये यासाठी सर्व इस्त्रायली ओलिसांची सुटका करावी अन्यथा आकाश कोसळेल, असा इशारा अध्यक्षांनी यापूर्वीच दिला होताष्ठ'! बायडेन प्रशासन किमान प्रतिक्रियांमध्ये तरी संवेदनशीलता दाखवत होते. ट्रम्प प्रशासन त्यांच्या तुलनेत अधिक 'प्रामाणिक' ठरते! फुकाची संवेदनशीलता हवी कोणास? ताज्या हल्ल्याबद्दल इस्त्रायलने हमासच्या आडमुठेपणाला जबाबदार धरले. वस्तुस्थिती तशी नाही. तिचा मागोवा घेणे प्राप्तस्थितीत अत्यावश्यक. बरोबर दोन महिन्यांपूर्वी म्हणजे १९ जानेवारी रोजी इस्त्रायल आणि हमासदरम्यान प्रथम शस्त्रविराम अमलात आला. याअंतर्गत, दोन्ही बाजूंनी ओलीस आणि युद्धकैद्यांची मुक्तता करणे, इस्त्रायली सैन्याने गाझा पट्टीतून पूर्ण माघार घेणे हे पहिल्या टप्प्यात अपेक्षित होते. त्याची पूर्तता दोन्ही बाजूंनी जवळपास संपूर्णतः केली. पहिल्या टप्प्यातला शस्त्रविराम १ मार्च रोजी संपुष्टात आला. दुसरा टप्पा सुरू होण्याआधी चर्चा होणे अपेक्षित होते. ही चर्चा अंतिम युद्धसमाप्ती, तसेच उर्वरित ओलीस व युद्धकैद्यांची देवघेव याविषयीची होईल हे पहिल्या टप्प्यात ठरले होते. पहिल्या टप्प्यातील शस्त्रविरामासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला, त्याचे श्रेय अर्थातच त्या वेळी ट्रम्प यांनी घेतले होते. दुसऱ्या टप्प्याची चर्चा पुढे सरकत नाही तेव्हा परिस्थिती 'जैसे थे' राहणे अपेक्षित होते. पण इस्त्रायलने पुन्हा एकदा भीषण हल्ले सुरू करून परिस्थिती पहिल्या टप्प्याच्याही आधीच्या अवस्थेत नेऊन ठेवली. याचे इस्त्रायलकडून दिले गेलेले कारण असे की हमासने पुरेशा संख्येने ओलिसांची मुक्तता केली नाही. हमासचे म्हणणे अर्थातच याउलट. ते असे की संपूर्ण युद्धसमाप्तीशिवाय सगळे ओलीस सोडता येणार नाहीत. संपूर्ण युद्धसमाप्तीपूर्वी हमासने गाझा पट्टीवरील ताबा सोडावा असा इस्त्रायलचा आग्रह आहे. या गोंधळवर्तुळात एका महत्त्वाच्या घडामोडीकडे जगाचे दुर्लक्ष झाले. ती बाह्यजगतासाठी किरकोळ असली, तरी नेतान्याहूंसाठी अत्यंत महत्त्वाची होती. पहिला शस्त्रविराम जाहीर झाला, त्या वेळी 'ज्युइश पॉवर' या नेतान्याहू सरकारमधील सहकारी पक्षाचे नेते इतामार बेन ग्विर यांनी त्या निर्णयाचा निषेध करत सरकारमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. मुळात नेतान्याहूंकडे क्नेसेट या इस्त्रायली कायदेमंडळात फार सशक्त बहुमत नव्हते. सात सदस्यीय 'ज्युइश पॉवर' बाहेर पडल्यामुळे ते अधिक तोकडे झाले. नेतान्याहूंना येत्या काही दिवसांत देशाचा अर्थसंकल्प मंजूर करून घ्यायचा आहे. त्यासाठी सुरक्षित बहुमत आवश्यक होते. सोमवार मध्यरात्रीपासून गाझावर हल्ले सुरू झाले आणि काही तासांतच म्हणजे मंगळवारी 'ज्युइश पॉवर' पक्ष पुन्हा सरकारमध्ये सामील झाला! म्हणजे नेतान्याहू सरकार तूर्त सुरक्षित. ७ ऑक्टोबर २०२३ पूर्वी राजकीयदृष्ट्या दुर्बल बनलेल्या नेतान्याहूंसाठी हमासचा हल्ला ही इष्टापत्ती ठरली आणि तेथून पुढे स्वतःचे राजकीय स्थान भक्कम करणे हेच त्यांचे प्रधान उद्दिष्ट राहील असे भाकीत 'लोकसत्ता'ने त्या वेळी वर्तवले होते. नंतरच्या घटनांची संगती लावल्यास गाझा युद्ध म्हणजे नेतान्याहूंच्या राजकीय अस्तित्वाची आणि महत्त्वाकांक्षेची लढाई यापेक्षा वेगळे काही नाही, हे लक्षात येईल. वैयक्तिक अस्तित्व आणि महत्त्वाकांक्षा यांच्या पूर्तीसाठी लाखोंचा बळी देणे किंवा त्यांना देशोधडीला लावणे हे प्रारूप रुजवणारे आणि वाढवणारे नेतान्याहू, ट्रम्प, पुतिन, जिनपिंग यांसारखे नेते जगभर वाढू लागले आहेत. यांचा शस्त्रविराम हा विदग्ध जनतेला दिलासा देण्यासाठी नसतो, तर युद्धातून आपल्याला काय मिळेल हे ठरवण्यासाठी वेळ मिळावा यासाठी असतो. यांची युद्धसमाप्ती बंदुकीच्या गोळ्या अथवा तोफांचे गोळे संपले म्हणून जाहीर होत नाही, तर आपले स्थान किती भक्कम वा खिळखिळे आहे याविषयीच्या निष्कर्षांवर जाहीर होते. अशाने युद्धजन्य परिस्थितीतून वाटाघाटीसुद्धा मानवकल्याणासाठी नसून आत्मकल्याणासाठी आणि सोयऱ्यांची सोय लावून देण्यासाठी होत असतात. प्रत्येक नव्या कारवाईसाठी धर्मसंकट, राष्ट्रसंकट, राष्ट्रप्रेम, धर्माभिमान अशा मध्ययुगीन संकल्पनांचा वापर खुबीने केला जातो. दुसऱ्याची जमीन, दुसऱ्याचे पाणी, दुसऱ्याची साधनसंपत्ती आपलीच म्हणावी नि आपलीशी करून घेण्यासाठी ओरबाडणूक करावी. हा यांचा खाक्या. त्यासाठी हाती असलेल्या अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा पाशवी वापर करून शत्रुदमनापेक्षा जनतेचा संहार करणे हेही यांना मान्य असते. या अशा विपरीत मतीच्या जागतिक नेत्यांमुळे जागोजागी विनाशाच्या खुणा दिसू लागल्या आहेतच. त्यांची व्याप्ती भविष्यात वाढेल हा धोका आपणही ओळखला पाहिजे!

चिमणी जगायलाच पाहिजे!

(जागतिक चिमणी दिवस)



चीनने सन १९५८-६२च्या दरम्यान चार कीटक मोहीम राबवली त्यात त्यांनी पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजेच उंदीर, माश्या, डास आणि चिमण्या हे चार कीटक नष्ट करायचे ठरवले. चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या काळात सुरू झालेल्या या चिमण्या मारण्याच्या अभियानमुळे चीनमध्ये चिमण्या जवळजवळ संपुष्टात आल्या, ज्याचा परिणाम गंभीर पर्यावरणीय असंतुलनात झाला, पुढची बरीच वर्षे चीनमधील लोकांना भयंकर उपासमारीला सामोरे जावे लागले. परंतु त्यामुळे पर्यावरणापुढे उभे राहू शकणारे धोके लक्षात आले. त्यानंतर अनेक वर्षांनी जगभरात, तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती 'चिमणी जगायला हवी' याची जाणीव निर्माण झाली. जगभरात २६ जातीच्या चिमण्यांची नोंद आहे. मात्र या २६ पैकी फक्त २३ चिमण्यांची छायाचित्र सध्या उपलब्ध आहेत. श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा समस्त मानवजातीला सावध करणारा महत्त्वपूर्ण संकलित लेख... संपादक.

जागतिक चिमणी दिन- वर्ल्ड स्पॅरो डे हा २० मार्च रोजी पाळला जातो. पहिला जागतिक चिमणी दिवस हा दि. २० मार्च २०१० रोजी साजरा करण्यात आला. आज चिमण्यांची संख्या कमी होत चालली आहे. खरं म्हणजे भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा, माणसाच्या जवळपास राहणारा आणि त्यामुळे नेहमी दिसणारा पक्षी अशी चिमणीची ओळख आहे. परंतु दिवसेंदिवस होत चालल्या बदलामुळे आता चिमण्यांच्या वास्तव्याला धोखा निर्माण झाला आहे.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

यासाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातोय. भारतात पाच प्रजातींच्या चिमण्या आढळून येतात. त्यामध्ये, स्थलांतर करणाऱ्या प्रजातींचादेखील समावेश आहे. या?शिवाय, जगातही २४ प्रकारच्या चिमण्या आढळून येतात. यापैकी बहुतांश प्रजातींची कोणतीही आकडेवारी उपलब्ध नाही. २०२०मध्ये गुजरातच्या गांधीनगर येथे झालेल्या १३व्या संयुक्त राष्ट्र प्रवासी पक्षी प्रजाती संवर्धन परिषदेत भारतातील पक्ष्यांची सध्याची स्थितीवरील 'स्टेट ऑफ इंडियाज बर्ड' अहवाल प्रकाशित करण्यात आला. देशभरातील दोन सरकारी आणि सहा स्वयंसेवी संस्था आणि अनेक पक्षी निरीक्षकांनी 'सिटिझन सायन्स' या संकल्पनेचा वापर करून हा अहवाल तयार केला आहे. पंधरा हजार पाचशे पक्षी निरीक्षकांच्या सुमारे एक कोटी निरीक्षणांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात आला. प्रकाशित अहवालात पक्षांच्या ८६७ प्रजातींचा समावेश करण्यात आला होता. या अहवालामध्ये असे म्हटले आहे की गेल्या २५ वर्षात आतापर्यंतची पक्षांच्या संख्येत सर्वात मोठी घट नोंदविली गेली आले. गेल्या पाच वर्षात पक्ष्यांच्या संख्येत तब्बल ७९३ घट झाल्याचेही या अहवालात म्हटले आहे. त्यातही कीटकभक्ष्यी असलेल्या चिमणीसारख्या पक्षांची संख्या कमी होणे, हे मानवासाठी धोकादायक असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. ८६७ पैकी १२६ प्रजाती अशा आहेत ज्यांचे प्रमाण स्थिर स्वरूपात असल्याचे आढळून आले आहे आणि काही ठिकाणी वाढलेलीही दिसते. मात्र, १०१ पक्ष्यांच्या प्रजातींच्या संवर्धनासाठी ताबडतोब प्रयत्न करण्याची गरज आहे, ज्यामध्ये चिमणी या पक्षाचा समावेश आहे. चिमण्यांची संख्या शहरी भागातून मोठ्या प्रमाणात कमी झाली असून ग्रामीण भागातही चिमण्यांचे प्रमाण कमी होत चालल्याचे या अहवालात म्हटले आहे.

गेल्या २५ वर्षांत सर्वाधिक घट झालेल्या पक्ष्यांच्या प्रजाती- १) पांढऱ्या पुठ्ठ्याचे गिधाड (व्हाईट रम्पड् व्हल्चर), २) रिचर्डची चिमणी (रिचर्ड्स पिपिट), ३) भारतीय गिधाड (इंडियन व्हल्चर), ४) सोन चिखल्या (पॅसिफिक गोल्डन प्लोवर), ५) बाकचोच तुतारी (कर्ल्यू सॅण्डपायपर). चिमण्यांची घटती संख्या हा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा घटक आहे. चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत असल्यामुळे याचे अनेक गंभीर परिणाम हे विविध परिसंस्थांवर दिसून येत आहेत. चिमण्यांची संख्या कमी झाल्याने त्याचा थेट परिणाम हा शेतातील पिकांवर झाला आहे. पिकांवर पडणाऱ्या रोगराईचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. पिकांवर पडणाऱ्या अळ्या आणि किडे चिमण्या खात असत. मात्र आता चिमण्यांची संख्या कमी झाल्याने पिकांवर पडणाऱ्या अळ्या, किड्यांचा उपद्रव अधिक वाढला आहे, परिणामी पिकांचा उतारा देखील कमी होत आहे. यावर उपाय म्हणून पिकांवर आरोग्यासाठी हानीकारक असलेल्या किटक नाशकांचा वापर केला जात आहे.

चिमण्या कमी होण्याची कारणे- १. उद्योगीकरणामुळे वातावरणात झालेला बदल आणि वाढते प्रदूषण. २. शहरीकरण व लोकांचे बदलते राहणीमान, फ्लॅट संस्कृतीतील सिमेंटची घरे यामुळे चिमण्या आपली घरे बनवू शकत नाहीयेत. आधीच्या काळात कौलारू घरं व त्यासमोर असणाऱ्या विहीर यामुळे चिमण्यांना आपले घर बनविणे अतिशय सोपे होते. बदलत्या बांधकामाच्या पद्धतीमूळे पक्षांच्या निवासावर देखील परिणाम होत आहे. ३. कमी होत चाललेली जंगले आणि शहरात निर्माण झालेली मोबाईल टॉवर्स व तारांची जंगले. ४. शेतात होणाऱ्या हानीकारक रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वारेमाप वापर, असले धान्य खाऊन चिमण्या मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. ५. विणीच्या हंगामात (प्रजननकाळात) चिमण्यांना मानवी आणि तंत्रज्ञानातील बाबींचा होणारा त्रास. ६. वाहनं आणि गर्दीचा गोंगाट यामुळेही देखील चिमण्यांना त्रास सहन करावा लागत आहे. ७. पाणथळीच्या जागा नष्ट झाल्याने पूर्वीचे अनेक पक्षी आता दिसत नाहीत. ८. जंगल तोडीमुळे चिमण्यांची घरटे नष्ट होतात. चिमण्यांच्या संवर्धनाचे उपाय- १. पक्षांच्या पाण्याच्या सोयीसाठी पाणथळीच्या जागांची निर्मिती करणे व त्यासोबतच धान्य सुद्धा उपलब्ध करून देणे. उरलेले अन्न पक्षांना टाकणे. आपल्या घराजवळ, बाहेर चिऊताईसाठी दाणा-पाणी ठेवणे अशा गोष्टी प्रत्येक जण करू शकतो. २. पक्षांच्या वावरासाठी नैसर्गिक परिवास निर्माण करणे. ३. शेतीसाठी नीकारक रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करणे. ४. जागतिक चिमणी दिन या दिवशी लोकांमध्ये चिमणी वाचविण्यासाठीची जागृती करणे, तिचे अन्नसाखळीतील- पर्यायाने पर्यावरणातील महत्त्व समजावणे, चिमणीला जगण्यासाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण करणे. ५. चिमणीला बाभळीसारख्या नैसर्गिक अधिवासाबरोबरच घरटे बांधण्यास अनुकूल गोष्टी उपलब्ध करून देणे, घराभोवती शक्य असल्यास छोटी झाडेझुडुपे लावणे.

चीनने सन १९५८-६२च्या दरम्यान चार कीटक मोहीम राबवली त्यात त्यांनी पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजेच उंदीर, माश्या, डास आणि चिमण्या हे चार कीटक नष्ट करायचे ठरवले. चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या काळात सुरू झालेल्या या चिमण्या मारण्याच्या अभियानमुळे चीनमध्ये चिमण्या जवळजवळ संपुष्टात आल्या, ज्याचा परिणाम गंभीर पर्यावरणीय असंतुलनात झाला, पुढची बरीच वर्षे चीनमधील लोकांना भयंकर उपासमारीला सामोरे जावे लागले. परंतु त्यामुळे पर्यावरणापुढे उभे राहू शकणारे धोके लक्षात आले. त्यानंतर अनेक वर्षांनी जगभरात, तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती 'चिमणी जगायला हवी' याची जाणीव निर्माण झाली. जगभरात २६ जातीच्या चिमण्यांची नोंद आहे. मात्र या २६ पैकी फक्त २३ चिमण्यांची छायाचित्र सध्या उपलब्ध आहेत.

महंमद दिलावर यांनी सन २००६मध्ये नाशिक येथे नेचर फॉरएव्हर सोसायटी नावाची एक संस्था स्थापन केली. त्यानंतर फ्रान्समधील इकोसिस ॲक्शन फाऊंडेशन आणि जगभरातील असंख्य राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने या संस्थेने सन २०१०पासून जागतिक चिमणी दिन साजरा करण्यास सुरुवात केली. जे लोक चिमण्यांच्या संवर्धनासाठी काम करतात, अशा लोकांचा संस्थेच्या वतीने जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने सत्कार देखील करण्यात येतो. या संस्थांमार्फत चिमण्या कमी होण्याची कारणे शोधण्यासाठी अभ्यास व त्यांच्या संवर्धनासाठी उपाय आणि वातावरणातील वाढत्या प्रदूषणाचा चिमण्यांवर होणारा परिणाम यासाठी जगभर चळवळ उभारली जात आहे, हे योग्यच आहे!

!! जागतिक चिमणी दिनी सर्वांना सावध होण्यास हार्दिक हार्दिक शुभेच्या !!

फेकनॅरेटिव्ह ..

वरून सक्त आदेश
फेकनॅरेटिव्ह बनवा
शोधा म्हणजे मिळे
विषयां नाही वानवा

इच्छा पूर्तता संपूर्ण
अल्लाउद्दीनचादिवा
झट पट सुधारे सारे
लाभे रामबाण दवा

प्रसिध्दी झोतांसाठी
शोध लागलायं नवा
रे नॅरेटिव्हचा भडका
तळा गळाशी न्यावा

पाहतापाहता पहावे
बदलून जाईलं हवा
कायखरे काय खोटे
विचार कशाला हवा

कोंडीत पकडा पक्षां
नवीन गनिमी कावा
बहादूरही नामोहरम
बळी पडतीलं डावा

सशक्त पक्ष हादरेलं
मारे जोशात लखवा
चितपटहोई पैलवान
सिधे अस्मानदाखवा

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

बेस्ट ईलाज...

साध्या सर्दी
पडशा
डॉक्टर हवेत बेस्ट
उच्चतम हॉस्पीटल
सुविधा हव्यात जेष्ठ

ए सी सुपर डिलक्स
खाजगी रुम उत्कृष्ट
चव नसू द्या जीभेला
जेवण देता स्वादिष्ट

अद्ययावत उपकरणे
सहज करती आकृष्ट
बाहेरच्या रंगा भुलले
तिथेचं सगळे संतुष्ट

एका मागून असंख्य
सुरु होतात त्या टेस्ट
जखम होते बोटाला
तपासणी करी चेस्ट

क्लिनिकल एक्झाम
रोग्याला मिळेना रेस्ट
मालक बनली व्याधी
आली बनून जी गेस्ट

आजारी राही तसाचं
आजार होतो धष्टपुष्ट
विमासुरक्षा? कवच ते
मेडीक्लेम दे धारिष्ट्य

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

अंधेरी एमआयडीसीमध्ये भीषण आग; अग्निशमन दलाचे आठ पाण्याचे ट्रॅंकर घटनास्थळी

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : पवई येथील आग विझत नाही तोपर्यंत मुंबईत गुरुवारी अंधेरी परिसरातही आग लागल्याची घटना घडली. अंधेरी पूर्वेकडील एमआयडीसी परिसरात गुरुवारी दुपारी दोन वाजता भीषण आग लागली. दोन मजली इमारतीच्या गाळ्यातमध्ये ही आग लागली होती. आगीची तीव्रता जास्त असून अग्निशमन दलाने तीन क्रमांकाची वर्दी दिली आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या दहा गाड्या व पाण्याचे आठ मोठे ट्रॅंकर घटनास्थळी आहेत.

मुंबईत दिवसभरात आगीच्या दोन घटना घडल्या. पवई येथील गगनचुंबी इमारतीत लागलेली आग पूर्णतः विझत नाही तोच अंधेरीतील एमआयडीसी परिसरात दुपारी दोनच्या सुमारास आग लागली. अंधेरी पूर्वेकडील महाकाली गुंफा मार्गावर शांती नगर परिसरात न्यू इंडस्ट्रीअल इस्टेटमध्ये एका दुमजली बांधकामात ही आग लागली होती.

दुमलजी बांधकामातील एका गाळ्यात ही आग लागली होती. एक हजार चौरस फूट परिसरात ही आग लागली आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाबरोबरच, पालिकेच्या विभाग कार्यालयाचे कर्मचारी, पोलीस यंत्रणा दाखल झाली आहे. अग्निशमन दलाचा मोठा ताफा आणि रुग्णवाहिका देखील दाखल झाल्या आहेत. आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, एमआयडीसीमध्ये विविध उद्योगधंद्यांचे गाळे असून या ठिकाणी आग लागल्यास त्याची भीषणता जास्त असते. दीड वर्षांपूर्वी या परिसरात लागलेली आग विझवण्यासाठी तब्बल बारा तास लागले होते. या परिसरातील गाळ्यांमध्ये विविध वस्तूंची गोदामे असतात. त्यात अनेकदा ज्वलनशील पदार्थही असतात. त्यामुळे अग्निशमन दलाने आधीच या तीन क्रमांकाची वर्दी दिली आहे.

दोन पोलिसांना लाच घेतल्याच्या आरोपाखाली अटक; गुन्ह्यांत मदत करण्यासाठी पैशांची मागणी केल्याचा आरोप

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : गुन्ह्यांत मदत करण्यासाठी व चारचाकी गाडी सोडवण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याच्या आरोपाखाली सहाय्यक फौजदार सुनील महादेव देसाई (५१) व पोलीस शिपाई विक्रम अतुल शेंडगे (३१) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. दोघेही बोरिवली येथील एमएचबी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. दोन्ही आरोपींना न्यायालयापुढे हजर करण्यात आले असता त्यांना दोन दिवसांची एसीबी कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती एसीबीकडून देण्यात आली. याप्रकरणी अधिक तपास करण्यात येत आहे.

याबाबत एसीबीकडून मिळालेल्या माहिनुसार, तक्रारदारांच्या विरोधात अपघात केल्याप्रकरणी १६ मार्च, २०२५ रोजी बोरिवली येथील एमएचबी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणात मदत करण्यासाठी तसेच गुन्ह्यांत जप्त करण्यात आलेली तक्रारदाराचे चारचाकी वाहन सोडवण्यासाठी आरोपी सहाय्यक फौजदार सुनील देसाई याने लाचेची मागणी केली होती. पण तक्रारदारांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी मंगळवार, १८ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे जाऊन तक्रार केली.

एसीबीच्या अधिकाऱ्यांनीही तात्काळ तक्रारीची नोंद करून याप्रकरणी तक्रारदारांनी केलेल्या आरोपींची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मंगलवारी एसीबीकडून पडताळणी करण्यात आली. त्यावेळी देसाई यांनी तक्रारदारांकडे लाचेची मागमी केल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी सुरूवातीला ३५ हजार रुपयांची मागणी केली होती. तडजोडीअंती २० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य करण्यात आले. पडताळणीनंतर एसीबीने तात्काळ सापळा रचला. त्यावेळी २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पोलीस शिपाई विक्रम शेंडगे यांना पकडण्यात आले.

ही रक्कम त्यांनी देसाईच्या सांगण्यावरून घेतल्याचे स्पष्ट झाल्यानंतर एसीबीने याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ कलम ७,१२ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला. याप्रकरणी दोघांनाही मंगळवारी अटक करण्यात आली. अटकेच्या कारवाईनंतर एसीबीने दोन्ही पोलिसांना याप्रकरणी न्यायालयापुढे हजर केले. न्यायालयाने याप्रकरणी दोन्ही आरोपींना दोन दिवसांची एसीबी कोठडी सुनावली. याप्रकरणी एसीबी अधिक तपास करीत आहे.

शिवसेना (शिंदे) पक्षाची पालिका आयुक्तांकडे तक्रार, सततच्या रस्ते कामामुळे नागरिकांना मनस्ताप

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : आधीच रस्त्यांच्या कामांमुळे मुंबईकरांना मनस्तापाला सामोरे जावे लागत असताना काही ठिकाणी नवा कोरा रस्ता पुन्हा पुन्हा खोदल्यामुळे नागरिकांच्या त्रासात भर पडते आहे. गिरगावातील बाबासाहेब जयकर मार्ग या रस्त्याचे नुकतेच सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात आले होते. आता हा रस्ता पुन्हा एकदा खोदण्यात आला आहे. या प्रकरणी शिवसेना (शिंदे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनीच पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे तक्रार केली आहे.

मुंबईत सध्या मोठ्या प्रमाणावर रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाची कामे सुरू आहेत. त्यामुळे रहिवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होते आहे. त्यातच काही ठिकाणी हे रस्ते पुन्हा पुन्हा खोदले जात असल्याच्याही तक्रारी पुढे येऊ लागल्या आहेत. गिरगाव परिसरातील बाबासाहेब जयकर मार्गाचे तीन ते चार महिन्यांपूर्वी कॉंक्रिटीकरण करण्यात आले होते. मात्र आता पुन्हा एकदा या रस्त्याचा काही भाग खोदण्यात आला आहे. पुन्हा रस्ता खोदण्यात आल्यामुळे तेथील नागरिकांना पुन्हा एकदा त्रासाला सामोरे जावे लागते आहे. तसेच याच रस्त्यावर मुगभाट क्रॉस लेन जंक्शनजवळही बेस्टच्या कामासाठी १० ते १५ फूट रुंद खड्डा खणण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावर पाय ठेवायलाही जागा नाही अशी परिस्थिती आहे. या प्रकरणी शिवसेना (शिंदे) पक्षाचे विभागप्रमुख दिलीप नाईक यांनी पालिका आयुक्तांकडे तक्रार केली आहे. बाबासाहेब जयकर मार्ग, सिताराम पोद्दार मार्ग, पहिली खत्तरगल्ली यांची गेल्या चार महिन्यांपासून दयनीय अवस्था असल्याचेही आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

गिरगावात रस्त्याच्या कामामुळे आधीच प्रदूषण झालेले आहे, वाहतूक व्यवस्था बिघडलेली आहे. पादचाऱ्यांचे हाल होत आहेत. त्यामुळे रस्त्याच्या कामामागे नियोजन आहे की नाही, असा प्रश्न नाईक यांनी उपस्थित आहे. रस्त्यांची कामे करताना उपयोगिता वाहिन्या टाकण्यासाठी आधीच समन्वय साधला जातो की नाही असा प्रश्नही त्यांनी विचारला आहे.

कंत्राटदाराला दंड

याबाबत रस्ते विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले, कॉंक्रिटीकरण केलेला रस्ता पुन्हा खोदण्यासाठी परवानगी दिली जात नाही, मात्र जयकर मार्गाच्या कॉंक्रिटीकरणात काही त्रुटी आढळल्यामुळे तेवढाच भाग पुन्हा कंत्राटदाराकडून त्याच्याच खर्चाने दुरुस्त करून घेतला जात आहे. त्याकरीता तो पुन्हा खोदण्यात आला आहे. अशा प्रकरणात कंत्राटदाराकडून दंडही वसूल करण्यात येतो, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्र्यांचा संकल्प खड्ड्यात घालतात अधिकारी

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना त्यांनी मुंबईतील सर्व रस्ते कॉंक्रिटीकरण करून गुळगुळीत करण्याचा संकल्प सोडला होता. मात्र मुंबई महापालिका प्रशासनातील काही झारीतील शुक्राचार्य शिंदे यांचा संकल्पच खड्ड्यात घालण्याचा प्रयत्न करीत आहेत का असा संशय निर्माण होत असल्याचा आरोप नाईक यांनी पत्रात केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून नगरपंचायतीतील सत्ताधाऱ्यांचा निषेध; विकास कामांमध्ये अनियमित असल्याचा केला आरोप, आमने-सामने येण्याचे दिले खुले आव्हान

कोरेगाव ■ अज्जू मुल्ला



कोरेगाव : कोरेगाव नगरपंचायतीच्या माध्यमातून शहरात होणाऱ्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर निधीचा अपव्य झालेला आहे, ही खरी वस्तुस्थिती आहे. आमदार शशिकांत शिंदे यांनी विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेद्वारे याविषयी आवाज उठवल्याने विरोधकांना पोटशूळ उठला आहे आणि त्यांनी विनाकारण गोंधळ घालण्यास सुरुवात केली आहे. विकासकामे जर योग्य आणि वस्तुनिष्ठ असतील तर विरोधकांना घाबरण्याचे काही एक कारण नाही. एकदा आमने-सामने या, जुना मोटर स्टॅंडवर शहरवासीयांसमोर काय ते होऊन जाऊ दे. तारीख आणि वेळ तुम्ही सांगा, आम्ही समोर येऊन चर्चा करतो, असे खुले आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी दिले आहे. यावेळी सत्ताधाऱ्यांचा जोरदार निषेध करण्यात आला.

गुरुवारी दुपारी साडेबारा वाजता शिवतीर्थ हुतात्मा स्मारक रोटरी उद्यान येथे पक्षाच्यावतीने पत्रकार परिषद घेऊन नगरपंचायतीतील सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल करण्यात आला. विधान परिषदेत नगरपंचायतीच्या कारभाराविषयी लक्षवेधी प्रश्न उपस्थित करणाऱ्या आमदार शशिकांत शिंदे यांचा निषेध करणाऱ्या नगरपंचायतीतील सत्ताधाऱ्यांचा यावेळी तीव्र शब्दात निषेध करण्यात आला.

माजी उपसरपंच प्रतिभाताई बर्गे, शिवसेनेचे माजी उपजिल्हाप्रमुख दिनेशआप्पा बर्गे, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य संजय पिसाळ, नगरपंचायतीतील विरोधी पक्षनेते हेमंत बर्गे, नगरसेवक प्रीतम बर्गे, कोरेगाव तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाचे संचालक अमरसिंह बर्गे, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश होळ, सामाजिक कार्यकर्ते दिनेश सणस, नवनाथमामा बर्गे, नामदेव गुरव, मनोज येवले, सागर दिलीप बर्गे, इरफान जमादार, राजू शेख यांच्यासह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

प्रतिभाताई बर्गे यांनी नगरपंचायतीतील सत्ताधाऱ्यांवर आरोपांच्या फैरी झाडत विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता असल्याचे निदर्शनास आणून दिले. सत्ताधारी गोंधळ माजवून कोरेगावकर नागरिकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. दिनेश आप्पा बर्गे यांनी नगरपंचायतीतील कामकाज अत्यंत चुकीचे सुरू असल्याचे निदर्शनास आणून देत हम करे सो कायदा असल्याचे सध्या सर्वत्र चित्र आहे. कोरेगावकरांच्या हक्काचे पाणी लोकप्रतिनिधी खुलेआम चोरून खटाव आणि माणमध्ये नेत आहेत. वर्षातील तीनशे दिवस कोरेगाव मतदार संघाला पाणी देणार, असे आश्वासन विधानसभा निवडणुकीत देणारे आता कुठे गेले आहेत, असा सवाल त्यांनी केला.

नगरपंचायतीच्या विकासकामाबद्दल स्थानिक नगरसेवक आणि पदाधिकारी बोलू शकत नाहीत. मोठा मासा सर्व काही करत आहे, असा आरोप दिनेश आप्पा बर्गे यांनी केला.

हेमंत बर्गे यांनी नागरिकांच्या कर रकमेतून नगरपंचायतीने ६५ लाख रुपये खर्च केले आहेत. त्यातून गोळेवाडीत जागा खरेदी केली आहे. गेली अनेक वर्षे जागा पडून आहे, हीच रक्कम शहराचे इतर विकासकामांसाठी वापरता आली असती, मात्र हम करे सो कायदा याप्रमाणे नगरपंचायतीतील सत्ताधारी मंडळी वागत आहेत. त्याचा सर्वसामान्य लोकांना त्रास होतोय, असा आरोप केला.

प्रीतम बर्गे यांनी नगरपंचायतीतील सत्ताधारी मंडळी ही राजकारणातून काम करत आहेत. विकास कामांमध्ये अनिमितता आहे, हे वारंवार दिसून आले आहे. मात्र या विषयावर कोणी बोलायला लागले की गोंधळ करून त्याचा आवाज दाबून टाकण्याची त्यांची प्रवृत्ती आहे. आजवर हे चालत आले, मात्र यापुढे ते चालू देणार नाही. पत्रकार परिषद घेऊन सत्ताधाऱ्यांनी भूमिका मांडण्यापेक्षा जुना मोठा स्टॅंडवर आमने-सामने येऊन आपली भूमिका स्पष्ट करावी. त्यातून कोरेगावकर जनतेला खरे काय अन खोटे काय, हे कळून येईल. दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. गणेश होळ, अमरसिंह बर्गे आणि मनोज येवले यांनी भूमिका मांडली. आमदार शशिकांत शिंदे यांच्यावर निष्कारण आरोप करणाऱ्यांनी अगोदर नगरपंचायतीचा कारभार कसा चालतो, हे पहावे आणि मगच बोलावे, असा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी नगरपंचायतीच्या कारभाराची चौकशी झालीच पाहिजे... झालीच पाहिजे, अशी घोषणाबाजी करण्यात आली.

चेहरे पाहून शहराचा विकास; अन्य भाग मात्र भकास

डॉ. गणेश होळ यांनी जोरदार बॅटिंग करत नगरपंचायतीतील सत्ताधाऱ्यांच्या कारभाराचा पाढाच वाचला. कोरेगाव शहरातील प्रवेशद्वारापासून अंतर्गत भागांपर्यंत सुरू असलेल्या आणि होऊ घातलेल्या विकास कामांचा पंचनामा त्यांनी केला. रेल्वे स्टेशन ते जुना मोटर स्टॅन्ड यादरम्यान उत्तर भागातच कसा विकास होतो ? शहराचा दक्षिण भाग नाही का ? तेथे मतदार राहत नाहीत का ? असा सवाल करत त्यांनी नगरपंचायतीतील सत्ताधाऱ्यांचा कारभारी असा उल्लेख केला आणि या कारभाऱ्यांवर टीका केली. शहरातील मोक्याच्या जागा हडप करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक विकासकामांच्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित करून नगरपंचायतीत अत्यंत चुकीचा कारभार सुरू असल्याचा आरोपांचा पुनरुच्चार केला.

रहिमतपूरच्या ऐतिहासिक शाही मस्जिदला पोलीस निरीक्षक सचिन कांडगे साहेब यांची सदिच्छा भेट



कोरेगाव ■ मेहमुद्दीन शेख

सातारा/कोरेगावः रहिमतपूर येथे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले एपीआय सचिन कांडगे साहेब यांनी रहिमतपूरच्या शाही मस्जिद ला रमजान निमित्त लोकांना शुभेच्छा देण्यासाठी आले असताना रहमतपुर मधील मधील मुस्लिम समाजाला या पवित्र महिन्याबद्दल व येणाऱ्या ईद निमित्त शुभेच्छा दिल्या व या पवित्र महिन्याचे महत्व सांगितले व लोकांशी आपले विचार मांडताना म्हणाले हा महिना लोकांना माणुसकी हा धर्म शिकवतो व माणसाने माणसाप्रमाणे राहिले पाहिजे यावेळी त्यांचे सहकारी पोलीस महेश शेडगे उपस्थित होते रहिमतपूर मधील सर्व मशिदींना पोलीस स्टेशन तर्फे चोख बंदोबस्त लावलेला आहे सर्वांनी सहकार्य करावे अशी विनंती यानिमित्ताने एपीआय कांडगे साहेब यांनी केली व साहेबांचा सत्कार रहिमतपूर चे अमीर साहब आबिद भाई व शाही मज्जिद चे सदस्य तोसिफ भाई मुल्ला व इतर कार्यकर्ते यांनी त्यांचा सत्कार केला व आभार मानले यावेळी मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाज उपस्थित होता.

वाघोलीतील उघडे डीपी बॉक्स ठरताहेत धोकादायक; नागरिकांचा जीव धोक्यात

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर





(पुणे) वाघोली : वाघोली परिसरातील अनेक भागात उघड्या डीपी बॉक्समुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. महावितरण त्यांच्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे. अनेक डीपींची झाकणे गायब झाल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. परिसरातील धोकादायक स्थितील डीपींची त्वरित दुरस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कचऱ्याच्या विळख्यात अडकले डीपी

रस्त्याच्याकडेला डीपी बसविण्यात आली आहेत. यातील अनेक डीपीचे झाकण गायब असल्यामुळे अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना याचा सर्वाधिक धोका संभवित आहे. परिसरात लहान मुले खेळत असताना पालकांच्या जिवाला घोरच लागतो. एखादी मोठी दुर्घटना घडण्याअगोदर या डीपींची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली जात आहे. अनेक डीपी व ट्रान्सफार्मर भोवती कचऱ्याचे ढीग साचलेले पहायला मिळतं आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. अनेक भागांत उघड्या डीपीकडे महावितरण सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहे. अनेक डीपींची झाकणे गायब झाल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.

महावितरणचे दुर्लक्ष


वाघोलीतील अनेक परिसरात अशा अनेक उघड्या डीपी आहेत. याकडे महावितरण कानाडोळा करीत असल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. डीपीही मृत्यूचा सापळा बनली आहे. पीएमटी बस स्टॅन्डच्या पाठीमागील रस्त्यावर उघड्या असलेल्या डीपी शेजारी सतत गर्दी पाहायला मिळते. तसेच, याठिकाणी असलेल्या दुकानांमध्ये ग्राहकांची गर्दी असते. जवळच असलेल्या डीपीमुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शॉर्टसर्किटची भीती

झाकण नसलेल्या डीपीतून शॉर्टसर्किट होऊन दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे असतानाही या महत्त्वाच्या बाबींकडे महावितरण आणि महापालिकेने दुर्लक्ष केले आहे. डीपींची दुरुस्ती आणि विजेशी संबंधित नादुरुस्त उपकरणाची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. परिसरातील डीपी बॉक्सला झाकण कधी बसवली जाणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

रंगपंचमी खेळताना युवतीचा बुडून मृत्यू

सातारा कराड ■ राहुल पवार



सातारा कराड : कराड तालुक्यातील टेंभू गाव परिसरातील टप्पा क्रमांक एक व धरण परिसरात आपल्या सहकारी मित्रासोबत रंगपंचमी खेळण्यासाठी आलेली १८ वय युवती बुडण्याची घटना घडली बुधवारी दुपारी १२ वाजल्याच्या सुमारास घटना घडली पोलीस व स्थानिक नागरिकांच्या कडून शोध घेण्याचं काम सुरू होते दरम्यान सायंकाळच्या सुमारास युवतीचा मृतदेह हाती लागला जुही घोरपडे वय १८ तालुका कराड जिल्हा सातारा असे बुडून मृत्यू झालेल्या युवती चे नाव आहे याबाबत मिळालेली घटना स्थळावरून माहिती अशी की कराड तालुक्यातील टेंभू येथे धरणातील टप्पा क्रमांक एक व या ठिकाणी संबंधित युवती आपल्या मित्रासोबत रंगपंचमी खेळत असताना युवतीसह तिच्या दोन सहकारी मित्राचा पाय घसरला आणि त्यांचा तोल जाऊन ते तिघे पाण्यात पडले पाण्यात पडल्यावर बुडालेल पाण्यातून बाहेर आले मात्र युवाती पाण्यात वाहून गेली माहिती मिळाल्यानंतर कराड तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत चौधरी पोलीस उपनिरीक्षक भैरव कांबळे यांच्यासह कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले या ठिकाणी स्थानिक नागरिक पोलिसांकडून संबंधित युवतीचा शोध घेतला सायंकाळच्या सुमारास तिचा मृतदेह मिळून आला संबंधित युवती बारावीची परीक्षा नुकतीच दिली असून रंगपंचमीच्या निमित्त ती आपल्या सहकाऱ्यांसोबत टेंभू धरण या ठिकाणी आली होती.

अक्षरस्पर्ष ड्रीम स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात संपन्न

सातारा ■ अर्चना जगताप



साताराः पुणे सामाजिक कार्यकर्त्या दीपाली ताई निखळ यांच्या अक्षरस्पर्ष ड्रीम स्कूलचा दुसरा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम आण्णा भाऊ साठे येथे अतिशय उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरवात ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप्रज्वलन करून झाली. नंतर विविध स्पर्धेत प्रावीण्य मिळवलेल्या लहान चिमुकल्या मुलांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे अक्षरस्पर्ष फाउंडेशनच्या

मतिमंद मुलांनी पण या विश्वाची आम्ही लेकरे या गाण्यावर उत्तम परफॉर्मन्स केला. सामाजिक कार्य करत असताना गरीब पालकांना इंग्लिश स्कूलची फि भरणे शक्य नसते हे लक्षात आल्यावर त्यांनी स्वतः हिंमतीने अक्षरस्पर्ष ड्रीम स्कूल सुरू केले. कमी फि मध्ये उत्तम दर्जाचे शिक्षण त्या मुलांना देत आहेत. आज या शाळेतील मुलामुलींनी खूपच सुंदर सादरीकरण केले. त्यांचा परफॉर्मन्स पाहून दीपाली ताई व सर्व शिक्षक यांची मेहनत दिसून येते. शिक्षकांनी कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन अतिशय सुंदर केले.

या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते मा.अनिल रेळेकर, अभिनेत्री मेघना झुझम, वसुंधरा ग्रुपच्या अध्यक्षा व सामाजिक कार्यकर्त्या योगिता गोसावी, इनर व्हीलच्या निशा पाटील, सामाजिक कार्यकर्त्या सुषमा कोंडे, लोकमत प्रतिनिधी अनिता म्हेत्रे, स्वप्न फाउंडेशनच्या वर्षा तांबोळी, सामाजिक कार्यकर्त्या सुषमा पंडित, सोफोश संस्थेच्या रजनी कलबुरगी, सोम फाउंडेशनच्या किर्ती कोकाटे व हर्षदा वाडेकर ई मान्यवर उपस्थित होते.

बाहेरुन येऊन झोपड्या उभारणाऱ्यांना फुकटात घरे मिळणार नाहीत; मुंबई उच्च न्यायालयाने ठणकावले !



परभणी ■ दत्तात्रय कराळे

परभणीः बाहेरुन येऊन झोपड्या उभ्या करणाऱ्यांना पुनर्वसनात फुकटात घरे देता येणार नाहीत. त्यामुळे सरकारी तिजोरीवरील ताण वाढला जातोय, असे मंगळवारी उच्च न्यायालयाने ठणकावले.

सध्याच्या झोपडपट्टी पुनर्वसनाच्या कायद्याचा आढावा घ्या. या कायद्यात काही बदल करावा का, यांची चाचपणी करा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाला दिले. त्याच अनुषंगाने या मुद्यावर न्या. गिरीश कुलकर्णी व न्या.अद्वैत सेना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरु आहे. या सुनावणीत न्यायालयाने झोपडीधारकांचे चांगलेच कान उपटले. झोपड्यांच्या बदल्यात चांगले घर घेताना झोपडीपट्टी धारकांना पैसे द्यावेच लागतील. असेही न्यायालयाने नमूद केले. यावरील पुढील सुनावणी ३ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे.

मुंबईसाठीच कटऑफ डेट का ?

झोपडपट्टी पुनर्वसन कायदा संपूर्ण महाराष्ट्रासाठी आहे. या अंतर्गत होणाऱ्या पुनर्वसनात आधार कार्ड व अन्य कागद पत्रांची सक्ती सर्वच ठिकाणी केली जाते.

बिटरगाव पोलिस स्टेशन अंतर्गत डी जे मुक्त शिवजयंती

दै, जनप्रभातचे ढानकी सर्कल प्रतिनिधी ■ गायकवाड सीमा तानाजी



ढाणकीः बिटरगाव पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या संपुर्ण परिसरात या वेळी तिथी प्रमाणे साजरी करणारी शिवजयंती ही या वेळी ठाणेदार कैलास भगत यांच्या पुढाकाराने संपूर्ण पोलिस पाटील याचीं शांतता कमिटी ची बैठक घेऊन या वेळी तिथी प्रमाणे साजरी होणारी शिव जयंती ही डी.जे मुक्त साजरी होण्यासाठी सर्व पोलीस पाटील व शिवजयंती उत्सव समितीचे सदस्य यांना शांतता कमिटी च्या सभेमध्ये सांगण्यात आले होते त्या मुळे परीसरातील पोलिस पाटील व सर्व शिवभक्तांनी तिथीप्रमाणे शिवजयंती ही साजरी करण्यासाठी बिटरगाव पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक गावामध्ये डी जे मुक्त शिवजयंती उत्साहाला भरभरून प्रतिसाद मिळाला हा सर्व प्रतिसाद बघुन परिसरातील जनतेचे ठाणेदार यांनी आभार मानले समोर येणारे सर्व सण व उत्सव हे आपण बिटरगाव परिसरात डी जे मुक्त होण्यासाठी पुढाकार घेऊ अशी प्रतिक्रिया ठाणेदार कैलास भगत यांनी दिली परिसरातील डी जे मुक्त शिवजयंती उत्सवांसाठी बिटरगाव पोलिस स्टेशन चे ठाणेदार कैलास भगत पी.एस.आय. शिवाजी टिपुर्णे, रवी गिते, रोशन सरनाईक, दत्ता कुसराम, प्रविण जाधव, अर्जुन राठोड, दत्ता कवडेकर, शरद चव्हाण आदी पोलिस कर्मचारी व पोलीस पाटील यांनी पुढाकार घेतला

म्हसळा शहरात भव्य मिरवणूक..शिवजयंती जल्लोषात साजरी गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान तर्फे शिवज्योत व शिव पालखीचे आयोजन

रायगड म्हसळा ■ प्रतिनिधी



म्हसळा रायगड : सालाबादप्रमाणे यंदाही फाल्गुन वद्य तृतीया शके १९४६ म्हणजेच तिथीनुसार श्रीशिवजयंती आंग्ल दिनांक १७ मार्च २०२५ रोजी म्हसळा शहरात उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली

गेली तेरा वर्षे गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठानच्या माध्यमातून दुर्गदुर्गेश्वर रायगडाहून म्हसळा शहरात शिव मशालज्योत आणली जाते तसेच पुण्यश्लोक छत्रपती श्री शिवाजी महाराजांची शिवपालखी मिरवणूक सोहळा देखील आयोजित करण्यात आला होता. गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान हे शिवविचारांवर चालणारे प्रतिष्ठान आहे. किल्ले रायगडावरून शिवज्योत आणण्यासाठी म्हसळा शहरातील सुमारे ३० तरुण ह्यामध्ये सहभागी झाले होते. गेली अनेक वर्ष गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान म्हसळा तर्फे अनेक उपक्रम राबविले जात असून म्हसळा तालुक्यांतील शिवविचारांचा जागर करण्यात प्रतिष्ठानचा फार मोठा वाटा असतो.

कुमार स्वामी म्हशिलकर २८ किलोमीटर तर श्री अंकित राजपूत, श्री प्रसन्न निजामपूर आणि कुमार ऋषी यांनी जवळजवळ १४ किलोमीटरचे अंतर शिवज्योत हातामध्ये धरून पायी धावण्याचा शिवपराक्रम केला. शिवज्योत म्हसळा शहरात आगमन झाल्यानंतर शिवज्योतीचे स्वागत म्हसळा दिघी नाक्यावर म्हसळा नगरपंचायतचे नगराध्यक्ष संजयजी कर्णिक, शिवसेना तालुकप्रमुख प्रसादजी बोर्ले, प्रविण उर्फ बाबू बनकर (शिवसेना उपतालूकाप्रमुख), सुरेशजी कुडेकर (शिवसेना उबाठा तालुकाप्रमुख), कौस्तुभजी करडे (युवसेना तालूका अधिकारी), म्हसळा पोलीस स्टेशनचे राठोड साहेब, पत्रकार बाबूजी शिर्के, पत्रकार संतोषजी उद्धारकर यांनी केले तसेच संध्याकाळी ५ वाजता तांबट आळी, म्हसळा येथून मिरवणूकीस प्रारंभ झाला. शिवपालखीच्या प्रथम पूजेचा मान म्हसळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप कहाले यांना दिला होता. तसेच समीरजी बनकर (हिंदू संघटना म्हसळा तालुका अध्यक्ष) यांनी शिवपालखीला प्रथम खांदा देऊन मिरवणूकीस प्रारंभ केला. तसेच यंदा पहिल्यांदा शिवजयंतीला महाडचे शिवतांडव ढोल, ताशा पथकाच्या गजरात, भगवे ध्वज नाचवत, जय भवानी - जय शिवाजी, हर हर महादेवच्या उत्तुंग घोषणा शिवजयंती साजरी करण्यात आली. संयुक्त शिवसेना म्हसळा तालूका आणि गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान तर्फे भव्य शिव-मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक मराठी वेशभूषा करीत महिला मंडळ अतिशय उत्साहात मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या. पत्रकार निकेशजी कोकचा याने छत्रपती शिवाजी महाराजांची हुबेहूब वेशभूषा आणि कु. पार्थ गोविलकर आणि कु. अथर्व नटे यांनी मावळ्यांची वेशभूषा करून कार्यक्रमाला अधिक शोभा आणली होती. श्रीवर्धन येथील कराटे, मनोरे, साहसी खेळांचे प्रत्यक्षिते दिघी नाक्यावर करण्यात आले.

शिवज्योत, शिवपालखी व शिवमिरवणूक सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष सचिन करडे, प्रसाद बोर्ले (शिवसेना म्हसळा तालुकाप्रमुख) प्रविण उर्फ बाबू बनकर (शिवसेना उप तालूकप्रमूख) स्वप्निलजी चांदोरकर (युवासेना तालूका अधिकारी), पवनजी भोई (शिवसेना शहरप्रमूख), संतोषजी कुडेकर (शिवसेना उबाठा तालूकाप्रमूख) कौस्तुभजी करडे (युवासेना तालूका अधिकारी) विशालजी सायकर (शिवसेना उबाठा शहरप्रमूख), प्रितम धिमर, मयुरेश करडे, राहूल पोतदार, प्रसन्न निजामपूरकर, सुशील यादव, अभय कळमकर, सुजित वेदक, निहार बनकर, श्रीयन करडे, श्लोक करडे, श्रेया करडे यांनी प्रयत्न केले.

वडोली निळेश्वर ग्रामपंचायत ची ग्रामसभा घरकुल प्रश्नावरून वातावरण तापले ग्रामसभा नियमबाह्य झाल्याचा ग्रामस्थांचा आरोप

सातारा कराड ■ प्रतिनिधी

कराड सातारा: कराड तालुक्यातील वडोली निळेश्वर १८ रोजी विशेष ग्रामसभा बोलवण्यात आली होती पंतप्रधान आवास योजनेतील पात्र अपात्र घरकुल विषयावरून वादळी चर्चा झाली सभेचे अध्यक्ष सरपंच भीमराव मदने यावेळी संभाजी पवार ग्रामसेवक ग्रामपंचायत सदस्य ग्रामस्थ उपस्थित होते घरकुल पात्रतेच्या यादीसाठी झालेल्या ठरावाचा सूचक रोहित डुबल. तर अनुमोदक अविनाश डुबल यांनी दिले यावेळी ग्रामस्थांनी विचारलेल्या प्रश्नांना ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडून समर्पक उत्तर न मिळाल्यामुळे ग्रामस्थ आक्रमक पवित्रा घेतला नंतर ग्रामसेविका पुष्पा कोळी यांनी अपात्र घरकुलातील १४ घरकुल पात्र करून ती यादी पंचायत समिती पाठवली असल्याचे सांगितले या यादीतील नावे वाचून दाखवली यानंतर पात्र घरकुल साठी ग्रामस्थांनी सहमती दर्शवली मात्र उर्वरित अपात्र यादीसाठी ग्रामसभेची सहमती दर्शवली नाही घरकुल प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे संभाव्य यादीत अनेक नावे असतात शासनाच्या निष्कर्षाप्रमाणे यादी शहानिशा ग्रामपंचायतचा ठराव ही सर्व प्रोसिडिंग करावी लागते त्याला विलंब लागतो ग्रामसभेत ठराव मंजूर करून तो पंचायत समितीकडे पाठवला जातो लाभार्थी साठी शासन अनुदान देते परंतु घरकुलाचा प्रश्न संभाव्य यादीत टप्प्याटप्प्याने पूर्ण होतो यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात असे काही जाणकार नागरिक चर्चा होती काही ठिकाणी संभाव्य यादीत नाव आहे परंतु घरकुल चा नंबर आला नाही अशी परिस्थिती निर्माण होते तोपर्यंत घरकुल प्रतीक्षेत राहावे लागत असते प्रत्येक गावात अशीच परिस्थिती निर्माण आहे असे काही जाणकार नागरिक सांगतात पात्र घरकुल यादी साठी आमची सहमती आहे मात्र उर्वरित अपात्र यादीसाठी आमची सहमती नाही अपात्र यादीसाठी कोणते निकष लावले आहेत याची माहिती मिळावी ग्रामस्थ अविनाश डुबल वडोली निळेश्वर अपात्र घरकुल घरकुलातील तपासणी अंती १४ घरकुल पात्र झाली असून ही नावाची यादी पंचायत समितीकडे मंजुरीसाठी पाठवली आहे वरिष्ठांचा आदेशानुसार पुढील कारवाई होईल ग्रामसेवक पुष्पा कोळी वडोली निळेश्वर यांनी प्रसारमाध्यमांना दिली आहे या ग्रामसभेची चर्चा परिसरात व गावात सुरू होती शासन दरबारी काय निर्णय होतोय याकडे गावाचं लक्ष व घरकुल लाभार्थी यांचं लक्ष लागून राहिले आहे घरकुल प्रकरणामुळे तालुक्यामध्ये चांगली चर्चा इतर गावागावात सुरू आहे.

केज तालुक्यासह शहरातील सर्व अवैद्य धंदे तात्काळ बंद करण्यात यावेत-अक्षय वाघमारे

केज ■ प्रतिनिधी



केज : केज तालुक्यासह शहरातील सर्व अवैद्य धंदे तात्काळ बंद करण्यात यावेत लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार केज यांच्याकडे भीमशक्ती सामाजिक संघटनेचे केज तालुकाध्यक्ष अक्षय वाघमारे यांनी मागणी केली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सध्या केज तालुक्यासह शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात सर्रासपणे मटका, गुटका,विविध प्रकारची दारू, अवैद्य प्रवासी वाहतूक यासह अनेक अवैद्य व्यवसाय चालू आहेत.

या अवैद्य व्यवसायाला नेमका अभय कोणाचा आहे व कोणाच्या आशीर्वादाने केज तालुक्यासह संपूर्ण शहरात अवैद्य धंदे चालू आहेत, तहसील कार्यालयाच्या व पंचायत समिती कार्यालयाच्या गेटवर व प्रांगणात सरसपणे मटका नावाचा जुगार खेळला व घेतला जात आहे.

तसेच मटका, गुटखा, हातभट्टी दारू सह विविध प्रकारचे दारू व अमली, मादक नसली पदार्थ सर्रासपणे विक्री केली जात आहे. तर अवैद्य प्रवासी वाहतूक देखील सर्रासपणे केली जात आहे.

गुटखा, दारू, अमली नशेली पदार्थांची नशा अनेक युवक करत आहेत सदर नशा पण करण्यामध्ये लहान लहान मुलांचे व युवकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. अशा नशा मुळे अनेक युवकांचे जीव गेले आहेत व अनेक युवकांचे आयुष्य उघड्यावर आले आहे.

केज तालुक्यामध्ये मटका खेळण्याचे व घेण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर उघडपणे सर्रास स चालू आहे. त्याचबरोबर शहरांमध्ये व तालुक्यात उघड्यावर मटका घेतला जातो व खेळला जात आहे यामध्ये युवक, नागरिक व महिलांचे प्रमाण मटका खेळण्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

मटका खेळल्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत अनेकांना तर स्वतःची शेती व घरे विकण्या शिवाय उरलेला नाही तर काही लोकांनी नशेच्या व मटक्याच्या कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या देखील केलेल्या आहेत.

तरी तात्काळ केज तालुक्यासह शहरातील अवैद्य धंदे कायमस्वरूपी बंद करण्यात यावेत असे लेखी निवेदनात म्हटले आहे. जर प्रशासनाने सदर मागणीची तात्काळ दखल घेतली नाही तर भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा लेखी निवेदनाद्वारे प्रशासनास दिला आहे.

सदर मागणीचे निवेदन तहसील कार्यालयाचे पेशकर ननवरे यांनी स्वीकारले आहे या लेखी निवेदनावर भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर, केज तालुकाध्यक्ष अक्षय वाघमारे, उपाध्यक्ष अशोक सरवदे, शहराध्यक्ष शिवकुमार हजारे, किशोर पोटभरे, सिद्धार्थ पोटभरे, विजयकुमार शिंदे, सुभाष शिंदे, सचिन शिनगारे, तुकाराम चौरे, शेख अलोदिन, संतोष सिरसागर, अजय वाघमारे, सतीश जोगदंड, जीवन शिरसट, माणिक माने इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत लेखी निवेदनाच्या प्रती तहसीलदार केज, जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय पोलीस अधिकारी केज, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज यांना दिलेल्या आहेत.

स्पर्श फाँऊन्डेशन तर्फे डतिथिनुसार शिवजयंती सोहळा वाठोडयात मोठया उत्साहात साजरा

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : स्पर्श फाउंडेशन द्वारा आयोजित हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिव छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती सोहळा (तिथिनुसार) वाठोडा चौकात मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम महाराजांच विधिवत पूजन करण्यात आले. त्यांनातर जय बजरंग अखाडयाला सुरवात झाली व लगेच महाराजांच्या जीवन चरित्र्यवर आधारीत शिवराय प्रोडक्शन निर्मित 'हिंदवी स्वराज्य ' नाटकला सुरुवात झाली. या नाटकाच्या माध्यमातून शिवभक्तांना महाराजांच्या जीवनावरील इतिहासा बद्दल माहिती देण्यात आली. हे सर्व कार्यक्रम बघून उपस्थित नागरिकांमध्ये जल्लोष निर्माण झाला व 'जय भवानी ..जय शिवराय ' घोषणा देऊन संपूर्ण परिसर दनानत होता तसेच या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सलिल देशमुख, गिरीश पांडव, दुनेश्वर पेठे, अनिल अहिरकर, तानाजी वनवे, श्रीकांत शिवकर, ज्ञानेश्वर रक्षक, वामनराव बांगडे, फकीरा जिभकाटे, प्रदीप बोलधन, चुन्नीलाल लांजेवार, अमोल देशमुख, सुभाष घाटे, राजू खरे, अमित रेंके, बाळाभाऊ सखारकर अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शंकर बनारसे, कमलेश वराडे, शुभम भोयर, लोकेश बांगडे, राकेश खोड़े, नत्थूजी दारोटे, योगेश न्यायखोर, गोलू महेशकर, हर्षल खडतकर, मनोज शेंडे, सक्षम हाड़गे, कमलेश जुगेले, पवन गावंडे, गंगारामजी ढोबळे, रोहित चोपकर, गोलू बांगडे, बादल जिभकाटे, सक्षम साठवणे असे अनेक पदाधिकारी यांनी कार्यक्रमासाठी योगदान दिले. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक व स्पर्श फाउंडेशनचे अध्यक्ष रुपेश बांगडे यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले व सर्व सदस्याचे आभार व्यक्त केले.

श्रीक्षेत्र रांजणगाव गणपती येथे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था शाखा उद्घाटन व हस्ताक्षर स्पर्धा बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन

पुणे ■ विवेकानंद फंड

पुणे : अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे यांच्या शिरूर शाखेचा उद्घाटन सोहळा व तालुकास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, दिनांक २३ मार्च २०२५ रोजी श्री महागणपती देवस्थान मंदिर सभागृह, रांजणगाव गणपती, ता.शिरूर येथे होणार आहे .

या कार्यक्रमासाठी श्री. माधव राजगुरू (अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे), श्री.अनिल कुलकर्णी (कार्याध्यक्ष, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे), श्री. उत्तमआण्णा भोंडवे (संस्थापक, समाजप्रबोधन संस्था, पेरणे - पुणे) आणि श्री. संजय ऐलवाड (सदस्य, मराठी अभ्यासक्रम मंडळ, पुणे विद्यापीठ) इ. मान्यवर उपस्थित राहणार आहे .

सदर कार्यक्रमात हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे. स्वरा भूजबळ, आराध्या गावडे, नियती कटारिया, अधिरा शेळके, शौर्य कळसकर, आरुष चव्हाण, आरुष लोखंडे, तेजस्विनी चिकटे , तेजस्विनी शिंदे, स्वरा पवार, सान्वी अडसुळ, शौर्यप्रताप कळसकर, सर्वज्ञ वाळके, अनिष्का पऱ्हाड, स्वरांजली भागवत, रुची निषाद ,अन्वी गायकवाड, सृष्टी बोऱ्हाडे, श्रेयश शिंदे, अस्मिता नळकांडे, ईश्वरी उबाळे, सह्याद्री वीर, आदिती गायकवाड ,अंबिका पवार, स्वानंद दंडवते ,शर्वरी गुंड, प्रगती वानखेडे, देवांशी झांजे ,विशेष शिक्षक सन्मान उमेश धुमाळ ,किरण अरगडे यांचा सन्मान होणार आहे. या कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या शिरूर शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

जलजीवन मिशन योजनेअंतर्गत चालू असलेल्या कामाची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित यंत्रणेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी-दशरथ चवरे

केज ■ प्रतिनिधी



केज : केज तालुक्यातील सोनिजवळा ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत जलजीवन मिशन योजने अंतर्गत चालू असलेल्या कामाची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित यंत्रणेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी लेखी निवेदनाद्वारे गट विकास अधिकारी पंचायत समिती केज यांच्याकडे दशरथ चवरे यांनी मागणी केली आहे.

याबाबतचे सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील सोनिजवळा येथे जल जीवन मिशन अंतर्गत सध्या पाईपलाईन व पाण्याच्या टाकीचे काम चालू आहे. सदर काम हे निकृष्ट दर्जाचे करण्यात येत आहे, सदर काम हे अंदाजपत्रका प्रमाणे पुणे गरजेचे असताना देखील सदर कंपनी मनमानी करून बोगस काम करत आहे.

सदर कामासाठी ४ कोटी १३ लाख रुपये एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे तरीदेखील सदर यंत्र नाही स्वतःच्या फायद्या करिता निकृष्ट दर्जाचे काम करत आहे त्याकरिता त्या कामाची तात्काळ एक समिती गठीत करून चौकशी करण्यात यावी.

संबंधित (कंपनीचे) कन्ट्रक्शन चे लायसन रद्द करण्यात यावे, जल जीवन अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम थांबविण्यात यावे, सदर काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे होत नाही. सदरचे काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे करण्यात यावे, सदर कामाची चौकशी होईपर्यंत तात्काळ काम थांबून सदर कंपनीचे देयक अदा करू नये, जर सदर कामाची आपल्या स्तरावरून एक समिती गठित करून चौकशी केली नाही तर दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी केज पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असे तक्रारदार दशरथ मदन चवरे यांनी गट विकास अधिकारी यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. सदर मागणीचे निवेदन हे सहाय्यक गट विकास अधिकारी अभिमान राठोड यांनी स्वीकारले. लेखी निवेदनाच्या प्रति गट विकास अधिकारी पंचायत समिती केज, जिल्हा अधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद विभाग बीड, तहसीलदार केज यांना दिले आहे.

पुणे धाराशिव संघाची विजेतेपदाला गवसणी तर मुंबई उपनगर सांगलीला उपविजेतेपद पिंपरी दुमाला च्या अनिकेत व साहिल या दोन सख्ख्या भावांची निर्णायक खेळी चर्चेत

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत पुणे व धाराशिव संघाने विजेतेपद पटकावले तर मुंबई उपनगर सांगली संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

पुणे धाराशिव या संघाने अहिल्यानगर येथे पार पडलेल्या हिरक महोत्सवी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत अजिंक्य पदावर मोहरा उमटवली महिला विभागात धाराशिव पुणे सांगलीचा तर पुरुष विभागात पुणे ने मुंबई उपनगराचा पराभव करीत जेते पदावर नाव कोरले पुण्याने ही कामगिरी सलग दुसऱ्या वर्षी केली हे विशेष अहिल्यानगर शेवगाव येथील खंडोबा मैदानावर हिरकमहोत्सवी राज्य अजिंक्यपद खो खो निवड चाचणी स्पर्धा पार पडली

महिला विभागातील अंतिम सामन्यात धाराशिव संघाने सांगलीचा एक डाव एक गुणांनी (११:१०) पराभव केला पहिल्या डावा सांगली संघाला केवळ पाच गुण मिळवता आले तर धाराशिवने आक्रमक खेळी करत अकरा गुण मिळवले मध्यंतरीला धाराशिव कडे सहा गुणांचे आघाडी होती जी सांगलीला पार करता आले नाही दुसऱ्या अकरा मनात चांगले ला फक्त पाच गुण मिळवता आले त्यामुळे धाराशिव संघाने सहज विजय मिळवला धाराशिवसंघातफै संध्या सुरवसे (३:१०:;१.४० मिनिटे संरक्षण व एक गुण) संपदा मोरे (१.२० मिनिटे संरक्षण व दोन गुण) अश्विनी शिंदे (१.४० २.४० मिनिटे संरक्षण) यांनी उत्कृष्ट खेळ केला सांगली कडून रितिका मगदूम (१.३० मिनिटे संरक्षण व पाच गुण) प्रत्यक्ष बिराजदार (१.१० मिनिटे संरक्षण व एक गुण) यांनी चांगली कामगिरी केली.

शुभम संध्या सर्वोत्तम खेळाडू

या स्पर्धेतील सर्व पुरुष खेळाडूंना प्रत्येकी दहा हजार रुपये देऊन गौरविण्यात आले पुण्याच्या शुभम थोरातला छत्रपती संभाजी राजे व धाराशिवच्या संध्या सुरवसेला राणी अहिल्याबाई पुरस्कार देऊन गौरवण्यात आले

उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार यादी सर्वोत्कृष्ट खेळाडू: शुभम थोरात पुणे संध्या सुरवसे (धाराशिव) उत्कृष्ट संरक्षकः अनिकेत चेंदवणकर (मुंबई उपनगर) अश्विनी शिंदे (धाराशिव) उत्कृष्ट आक्रमकः सुरेश गरगटे (पुणे) सानिका चाफे (सांगली) पिंपरी दुमाला येथील अनिकेत व साहिल हे दोन्ही भाऊ जिल्हा बरोबर आज राज्याच्या संघामध्ये खेळत असून समस्त पिंपरी दुमाला ग्रामस्थांसाठी हा क्षण गौरव शाली असून पिंपरी दुमाला गाव क्षितिजा पलीकडे घेऊन जाण्यासाठी अनिकेत व साहिल यांचे योगदान महत्त्वाचे समस्त ग्रामस्थ पिंपरी दुमाला.

पक्षीमित्र उत्तम पेठकर हे उत्तमोत्तम बहाद्दरपूरी भूत दया मित्र !:वृक्षमित्र शिवसांब घोडके

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार: आज २० मार्च २०२५ म्हणजे २० मार्च २०१० रोजी बरोबर १५ वर्षापूर्वी चिन देशाने चिमण्यांना नष्ट करण्याचा विडा उचलल्या नंतर जगातील इतर देशांनी ईवल्याशा जीवांना अभय देण्यासाठी जागतिक स्पॅरो डे अर्थात जागतिक चिमणी दिवस २० मार्च २०१० रोजी पहिल्यांदाच साजरा केला. चिमणी-पाखरांच्या दिवसावर कटाक्ष टाकले आहे. आज मानवास इटूकली बिचारी चिमणी प्रश्न विचारते आहे. चिमणी दिवस साजरा

करतांना, छतावरती दाणा-पाणी ठेवाल का? आमचे अस्तित्व इतिहासात जमा, छोट्याशा जीवांना अभय द्याल का? आज कंधारच्या ऐतिहासिक राष्ट्रकुट कालिन किल्ल्या समीप अज्ञात वाहनाच्या धडके जखमी झालेला ईवलासा बुलबुल पक्षी द्रुतगती महामार्गावर विव्हळत पडला होता. त्या मार्गावरुन वनरक्षक वृक्षमित्र शिवसांब घोडके व सहकारी वन्यजीव आभ्यासक गजानन शेकापूरे हे दोघेही जागतिक चिमणी दिनाच्या औचित्याने पक्षीमित्र उत्तम पेठकर बहाद्दरपूरा ता. कंधार येथील छ. शिवरायांच्या चौकात सुंदर अक्षर कार्यशाळा कंधार गेली १० वर्षापासून आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यास असतांना पाहिले. आगोदर त्या बुलबुल पक्षावर उपचार करत त्या इवलाशा जीवास पाणी पाजवताच तो शुध्दीवर आला. त्यानंतर १० मिनीटांनी तो उडून तारावर बसला. नंतर कांही क्षणात तो झाडावर उडून गेला. त्यानंतर आम्ही पक्षीमित्र उत्तम पेठकर यांचा सत्कार गेली १०१२ वर्षापासून अखंडित करत असतो, कारण उत्तम पेठकर गेली ५०६० वर्षापासून चिऊताई व पक्षांना दररोज २५ तांदूळ, शेव, चिवडा, मानवांना ५० जार बारमाही पिण्याचे शुध्द पाणी, मन्याड नदीतल्या माश्यांना रोज ३ किलो शेंगदाना पेंड आणि गोमातेस हिरवे वैरण असा दिनक्रम उत्तम पेठकर यांचा असतो. म्हणून वनरक्षक वृक्षमित्र शिवसांब घोडके यांच्या समर्थ हस्ते शाल, पुष्पहार आणि पांढरा पांगरा या वृक्षांचे रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी आपले विचार मांडतांना वनरक्षक घोडके म्हणाले उत्तमराव पेठकर हे पक्षीमित्र आहेत पण मला यापूढे जाऊन म्हणावे वाटते ते मन्याड खोऱ्यातील उत्तमोत्तम भूत दया मित्र आहेत, यांचा आम्हास सार्थ अभिमान वाटतो आहे. या सत्कार समारोह प्रसंगी क्रांतिभुवन बहाद्दरपूरा नगरीतील गजानन सावरकर कविराज शेफी शेख, विजय गुंडावार ,माकन चन्नावार, जगन्नाथ कुरूंदे गुरूनाथ पेटकर (वकील साहेब)आदींची उपस्थिती होती !चहा-पाना नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

दहा टक्के व्हॅट आकारणीचा बार मालकांद्वारे निषेध; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन : दरवाढ रद्द करण्याची मागणी

परभणी ■ वसंत आवटे



परभणी : राज्यातील परमीट धारकांच्या मद्यविक्रीवर शासनाद्वारे सरसकट दहा टक्के अतिरिक्त व्हॅट आकारला जात असल्याच्या निषेधार्थ जिल्ह्यातील बार मालकांनी बार बंद ठेवून दरवाढ रद्द करण्याची मागणी केली.

जिल्ह्यातील बार मालकांनी गुरुवारी (दि. २०) जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांना या संदर्भात एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, दर वर्षी परवाना नूतनीकरण करताना १० टक्के दरवाढ करण्यात येते, परंतु यावर्षी १० टक्के ऐवजी १५ टक्के दरवाढ केली आहे, ही दरवाढ अत्यंत अन्यायकारक आहे, असे नमूद करीत एकीकडे जनगणनेच्या आधारावर परवाना शूल्क आकारल्या जाते. तर दुसरीकडे त्याची विडंबना होत आहे आणि त्याचे दुष्परिणाम व्यावसायावर होत आहेत. शहराला ४ लक्षच्या वर शुल्क आहे, तर परभणी पासून ३ किलोमीटर अंतरावर हिच शुल्क केवळ ८० हजार आहे. याबाबत विचार करण्यात यावा, असे या निवेदनात म्हटले आहे.

राज्यातील परमीट धारकांच्या मद्यविक्रीवर सरकारकडून सरसकट दहा टक्के अतिरिक्त व्हॅट आकारला जात आहे. हा व्हॅट थेट मद्य उत्पादकांवर आकारला जावा, जेणेकरून शासनाचे उत्पन्न वाढेल. परमीट रूम व्यावसायिक शासनाचा महसूल भरून व्यवसाय करीत आहेत. सरकारने उत्पादक, वितरक, किरकोळ परमीट रूमधारक या सर्वांना सारखीच कर प्रणाली जर लागू केली तर सरकारचा महसूल वाढू शकेल. वाइन शॉप यांना व्हॅट न आकारता सर्व कर उत्पादकांकडून वसूल करावा, जेणेकरून परमीट रूमधारकांनाही योग्य दराने मद्य विक्री करता येईल, अशी अपेक्षा या निवेदनाद्वारे व्यक्त केली.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष दिलीप माने, संघाचे उपाध्यक्ष अरुण भीसे, सचिव अतुल शेळके, वसंततात्या मुरकुटे, दिपक तलरेजा, सेलू ता.अध्यक्ष भाऊ सोनवणे, संतरामजी काष्टे, गजानन लहाने, अशोक जैस्वाल, गंगाखेड येथून राजु लांडगे, दिपक गौर, शिवाजी डोळे, केंद्रे साहेब, पालम येथून खटील पाटील, बालू क्षीरसागर, जिंतूर येथून भीमराव घुले, बालाजी राठोड, देवेंद्र अण्णा भुरे, नवले पाटील येलदरी, बाळू माकोडे, अप्पा इटोली, उत्तमराव चव्हाण, राजु बरंगे, दिपक गोल्ड, राजेश मारवाडी, बेंबाळकर सतीश, संजय डेंबरकर, सखाराम, हॉटेल सावली सेलू, विवेक संगमे, शंकरराव तळेकर, किशन रसाळ, रंजीत गायकवाड, शेरेकर, आर. के. बोरा, बाळुअण्णा माकोडे, दत्तराव नवले, बालाजी कलमे, अमीत रिजवानी, आबा सुन, राजु कऱ्हाळे, सागर जैस्वाल, सतीश भनभणे, राज चव्हाण आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

'त्या' गोसेवकांचा गणपती संस्थान व बुलंद छावा संघटनेतर्फे सत्कार



गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील

गंगापूर: गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील समृद्धी महामार्गांवर एक भरधाव जाणाऱ्या पिकअपने कंटेनरला जोराची धडक दिली होती त्या अपघातग्रस्त पिकअपमध्ये तब्बल चार हजार किलो गोमांस होते त्यामुळे लासूरगाव, लादूर स्टेशन, वैजापूर येथील बजरंग दल, विश्व हिंदू परिषदच्या गोसेवकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन गोमांस शिल्लेगाव पोलिसांच्या कारवाईनंतर विधिवत मार्गाने दफन केले होते त्यामुळे लासुन स्टेशन येथील गणपती संस्थान वं बुलंद छावा संघटनेचे कृष्णा पऱ्हाड, गणेश प्रहाड यांच्यावतीने सर्व गोसेवकांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करून सत्कार केला.

वैजापूर बजरंग दल चे अध्यक्ष गणेश गोंडे, टायगर ग्रुपचे अध्यक्ष सुरेश साळुंखे, सचिन धुदाट, अजय पाटील साळुंके, अनिकेत अर्नाजेलम, ऋषिकेश जाधव बजरंग दल गंगापूर तालुका अध्यक्ष, परमेश्वर शेजुळ, मनोज पवार, अर्जुन लाड, मनोज जगदाळे, गणेश जाधव, ऋषिकेश सुपेकर, रोहीत थोरात, चेतन पगार, वाल्मीक थोरात भुसन रनयेवले आदिची उपस्थिती होती.

गुंतवणुकदारांसाठी रेड कार्पेट, उद्योजकांच्या अडचणी प्राधान्याने सोडविणार : विजयलक्ष्मी बिदरी

नागपूर विभागाच्या गुंतवणुकदार परिषदेमध्ये ६ हजार कोटीचे सांमजस्य करार;१५२ उद्योगामध्ये ६ हजार ७५६ रोजगार निर्मिती होणार;उद्योजकांना एक खिडकीद्वारे सर्व सुविधा मिळणार

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : विदर्भात विविध क्षेत्रात झालेल्या सांमजस्य कराराचे प्रत्यक्ष गुंतवणुकीमध्ये रुपांतर व्हावे यासाठी उद्योजकांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा व विभागीयस्तरावर विशेष प्राधान्य देण्यात येत आहे. उद्योजकांनी मोठ्या प्रमाणात विभागात गुंतवणूक करावी, असे आवाहन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले आहे.

उद्योग सहसंचालक कार्यालयातर्फे विभागीयस्तरावर गुंतवणूक परिषद - २०२५ चे आयोजन येथील नियोजन भवनाच्या सभागृहात करण्यात आले. या परिषदेत १५२ उद्योजकांचे ६ हजार १०० कोटी रुपयांचे सामंज्यस्यकरार श्रीमती बिदरी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. त्यावेळी मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या.

यावेळी उद्योग सहसंचालक गजेंद्र भारती, चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिजचे अध्यक्ष झुलपेस शहा, हिंगणा एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष पी.मोहन, बुटीबोरी एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. किशोर मालविया, मैत्रीचे समन्वय अधिकारी भास्कर मोराडे, सिडबीचे सहायक महाव्यवस्थापक संतोषराव मोरे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी मनोहर पोटे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक एस.एस.मुद्दमवार तसेच उद्योजक, गुंतवणुकदार यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

विभागीय गुंतवणुकदार परिषदेमध्ये गोदिंया येथे एक्सलोपॅक इंडिया लिमिटेड या हायटेक पेपर इंडस्ट्रिज व पॅकेजिंग क्षेत्रातील कंपनीतर्फे ९५० कोटी, तसेच पेपर उद्योगात २२५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकी संदर्भात शशांक मिश्रा यांनी केली आहे. बुटीबोरी येथे इंनव्हेन्टीस रिसर्च कंपनीतर्फे औषध व रासायनिक निर्मिती क्षेत्रात ७०० कोटी रुपयाची गुंतवणूक, हॉटेल ताज गेटवे(पीडीप्रॉपर्टीज)पर्यटन क्षेत्रात ४०० कोटी, हयात हॉटेल (रचना प्रॉपर्टीज) पर्यटन क्षेत्रात ३०० कोटी रुपये फेयर व्हॅल्यु हॉस्पीटॅलिटी क्षेत्रात १३१ कोटी ३० लक्ष रुपये, हॉटेल हिलटॉन तर्फे पर्यटन क्षेत्रात १७५ कोटी रुपये, विठोबातर्फे १०० कोटी रुपये आदी १२५ उद्योजकांनी ६ हजार १०० कोटी रुपयाचे सामंजस्यकरार यावेळी केले.

औद्योगिक गुंतवणुकीकरिता पोषक वातावरण निर्माण करतांनाच उद्योजकांना सुलभ सुविधा निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होत असून दावोस येथे झालेल्या वर्ड इकानॉमिक कोरम मध्ये राज्यात १५.६० लक्ष कोटीचे सामंजस्यकरार झाले आहेत. जिल्हास्तरावर गुंतवणुकदारांना आकर्षित करण्यासाठी उद्योजकांना रेड कारपेटसह आवश्यक सर्व सुविधा प्राधान्याने उपलब्ध करुन देत असल्याचे श्रीमती बिदरी यांनी यावेळी सांगितले.

विभागीय गुंतवणुक परिषदेमध्ये विविध क्षेत्रात गुंतवणुक होत असून यामध्ये पर्यटन व उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणुक होत आहे. गडचिरोली जिल्हा स्टिलहब म्हणून विकसित होत असून मोठया प्रमाणात येथे गुंतवणुक येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसाच्या विशेष कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत उद्योजक व गुंतवणुकदारांना येणाऱ्या अडचणी सोडविण्याला प्राधान्य दिले आहे. त्याअंतर्गत जिल्हाधिकारी जिल्हास्तरावर तर विभागीय आयुक्त विभागीयस्तरावर आढावा घेऊन उद्योजकांच्या अडचणी सोडवतील असे विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी यांनी सांगितले.

उद्योग सहसंचालक गजेंद्र भारती यांनी स्वागत करुन प्रास्ताविकात दावोस येथील परिषदेमध्ये विदर्भासाठी ७ लक्ष कोटीचे करार झाले असून यामध्ये नागपूर जिल्ह्यासाठी १ लक्ष ६ हजार कोटीचे सामंजस्यकरार झाले आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये लघु व मध्यम क्षेत्रात गुंतवणुक यावी यासाठी उद्योग विभागातर्फे प्रयत्न आहेत. विभागात औद्योगिक, पर्यटन, माहिती तंत्रज्ञान, लॉजिस्टिक, सेवाक्षेत्रासह विविध उद्योगांमध्ये गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण आहे. ईज ऑफ डुइंग बिजनेस मध्ये शासनाने पारदर्शकता आणली असून मैत्री कायदा पारित केला आहे. याची अंमलबजावणी मैत्री पोर्टलद्वारे होत असल्याने उद्योजकांना सर्व सुविधा एका खिडकीद्वारे प्राप्त होत असल्याचे यावेळी उद्योग सहसंचालक श्री. भारती यांनी सांगितले. विविध क्षेत्रात उद्योग सुरु करण्यासाठी सामंजस्यकरारानंतर प्रत्यक्ष ८० ते ९० टक्के उद्योजकांनी प्रत्यक्ष उद्योग सुरु करण्याला सुरुवात केली आहे. नागपूर हे वाहतूक व दळणवळणाच्यादृष्टीने मध्यवर्ती असल्यामुळे उद्योजक येथे आकर्षित होत आहे. भारतातील पहिला अत्याधुनिक कागद उद्योग सुरु करणारे झेलोपॅक इंडिया लिमिटेडचे शशांक मिश्रा व इंनव्हेन्ट्री रिसर्च कंपनीचे डॉ. दीपक बिरेवार यांनी येथे तंज्ञ मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे संचलन व आभार उद्योग विभागाचे महाव्यवस्थापक एस.एस. मुद्देमवार यांनी मानले.

राज्यात १ एप्रिल ते १० मे दरम्यान 'जिवंत सातबारा मोहिम'

नागपूर विभागातही कालबद्ध मोहिम राबविण्यात येणार; विभागीय आयुक्त यांची विभागीय संनियंत्रण अधिकारी म्हणून नेमणूक

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : महसूल विभागाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी अधिकार अभिलेखामध्ये अद्यावत करुन मयत खातेदारांच्या वारसाच्या नोंदीचे कामकाज पूर्ण करण्याच्यादृष्टीने राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये १ एप्रिल ते १० मे २०२५ दरम्यान 'जिवंत सातबारा मोहिम' राबविण्याचा शासन निर्णय आज जारी करण्यात आला आहे. नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्येही ही मोहिम कालबद्धरित्या राबविण्यात येणार असून विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची विभागीय संनियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत राज्यात १ ते ५ एप्रिल २०२५ दरम्यान ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) हे त्यांच्या सजा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये चावडी वाचन करुन न्यायप्रविष्ठ प्रकरणे वगळता गाव निहाय मयत खातेदारांची यादी तयार करतील. तर ६ ते २० एप्रिल २०२५ दरम्यान वारसासंबंधी आवश्यक कागदपत्रे (मृत्यूदाखला, वारसाबाबत सत्य प्रतिज्ञालेख/स्वयं घोषणापत्र, पोलीस पाटील/सरपंच/ग्रामसेवक यांचा दाखला, सर्व वारसांचे नावे, वय, पत्ते व दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक, रहिवासबाबतचा पुरावा) ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडे सादर करावी लागणार आहेत. तसेच तलाठी हे स्थानिक चौकशी करुन मंडळ अधिकाऱ्यांच्या मार्फत वारस ठराव ई-फेरफार प्रणाली मध्ये मंजूर करतील.

२१ एप्रिल ते १० मे २०२५ दरम्यान ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) हे ई-फेरफार प्रणाली मध्ये वारस फेरफार तयार करतील व यानंतर सर्व जिवंत व्यक्ती सातबारा वर नोंदविण्यासाठी म.ज.म.अ. १९६६ च्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन मंडळ अधिकारी हे वारस फेरफारावर निर्णय घेऊन सातबारा दुरुस्त करतील.

विभागीय आयुक्त असतील विभागीय संनियंत्रण अधिकारी

राज्यामध्ये विभागस्तरावर विभागीय आयुक्तांना या शासन निर्णयाद्वारे विभागीय संनियंत्रण अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. नागपूर विभागासाठी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची विभागीय संनियंत्रण अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यांचा नियमित आढावा घेऊन त्याबाबतचा साप्ताहिक अहवाल त्या शासनाला सादर करणार आहेत.

हा कालबद्ध कार्यक्रम राबविण्याकरिता जिल्ह्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची 'नियंत्रण अधिकारी' म्हणून तर तालुक्यासाठी तहसिलदारांची 'समन्वय अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रात हा कार्यक्रम विहित मुदतीत राबविण्याची त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी आता ११ महिण्याचा

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा : भंडारा, राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ११ महिने करण्यास करण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधीत आस्थापनेत पुन्हा रुजु झाल्याच्या दिनांकापासून ५ महिन्याच्या कालावधीसाठी कार्य प्रशिक्षण अनुज्ञेय असेल.

ज्या प्रशिक्षणार्थीचा ६ महिन्याचा प्रशिक्षण कालावधी यापूर्वीच पूर्ण झाला आहे. अशा उमेदवारांना पुढील ५ महिन्याच्या प्रशिक्षणासाठी संबंधीत आस्थापनेत रुजु होण्यासाठी उमेदवार रुजुची अंतीम तारीख ही ३० एप्रील २०२५ असून संबंधीत आस्थापनांनी प्रत्यक्षात उमेदवारांना रुजु करुन घेऊन आस्थापनेच्या लेटरहेडवर नियुक्ती आदेश हार्डकॉपीसह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, बसस्टँड जवळ, भंडारा येथे प्रत्यक्ष जमा करावे.

या योजनेत यापूर्वी सहभागी असलेल्या खाजगी आस्थापनांनी पीएम्एम्दिव्हम्देर्ड्यूग्दह/उद्यमआधार व ईइ/ऐंएफ/ उएऊ/ अइळ यापैकी एक अशाप्रकारे किमान दोन प्रमाणपत्र विभागाच्या ळूेः//. म्स्ब्ज्ब. स्ॅर्ब्स्. ुदन.ग्ह या संकेतस्थळावर शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत सादर करावे. उमेदवार रुजु होते वेळी तो संबंधीत आस्थापनेत तसेच सदर आस्थापनेशी संबंधीत इतर आस्थापना/कार्यालयात यापूर्वी कधीही कायम/तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील.

तसेच संबंधीत आस्थापनेने ही कार्य प्रशिक्षणासाठी रुजु होणारा प्रशिक्षणार्थी यापूर्वी सदर आस्थापनेत अथवा सदर आस्थापनेशी संबंधीत इतर आस्थापना/ कार्यालयात कायम/तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील.

हे दोन्ही प्रमाणपत्र संबंधीत आस्थापनेने उमेदवार रुजु झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिल्हा क्रीडा संकुल, बसस्टॅन्ड जवळ, भंडारा या कार्यालयास सादर करावे.

खेलो इंडिया बॉक्सिंग सेंटर करीता प्रशिक्षकाची निवड २५ मार्चला

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : केंद्र सरकारच्या खेलो इंडिया प्रकल्प अंतर्गत संपूर्ण भारतात खेलो इंडियाचे एक्सलेन्स सेंटर निर्माण करण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत जिल्ह्याला बॉक्सिंग या क्रिडा प्रकारचे सेंटर प्राप्त झालेले आहे. या प्रशिक्षण केंद्रासाठी प्रशिक्षकाची करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक पात्र व्यक्तींनी दि. २५ मार्च रोजी दुपारी १२ वाजता आवश्यक कागदपत्रासह जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी अशा मेश्राम यांनी केले आहे.

निवड झालेल्या प्रशिक्षकास मासिक २५ हजार रुपये मानधन देण्यात येणार असून प्रशिक्षकाची निवड जिल्हा क्रिडा संकुल येथे शैक्षणिक पात्रता, कौशल्य चाचणी व मुलाखत या आधारवर करण्यात येणार आहे. यासाठी उमेदवाराचे वय १८ ते ४५ वर्ष वयोगटामध्ये अतिउच्च कामगीरी, गुणवत्ता असल्यासच समितीच्या मान्यतेने ५० वर्ष पर्यंत उमेदवारांना संधी देण्यात येईल.

ऑलिपिक, एशियन गेम्स, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा सहभाग, पदक प्रापत प्रशिक्षणाच्या अनुभवासह, जागतिक करंडक स्पर्धा, एशियन चॅम्पियनशिप, साऊथ एशियन स्पर्धा, संबंधीत खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा सहभाग, पदक प्राप्त खेळाडू प्रशिक्षणाच्या अनुभवासह, राष्ट्रीय किंवा राज्य पुरस्कारार्थी प्रशिक्षणाच्या अनुभवासह, एएनआयएस पदविका किंवा सबंधीत खेळाचे अधिकृत लेव कोच्रेस किंवा बीपीएड, एमपीएड सह राष्ट्रीय स्पर्धा पदक प्राप्त किंवा राष्ट्रीय गेम्स पदक प्राप्त प्रशिक्षणाच्या अनुभवासह, राज्यस्तर खेळाडू बीपीएडसह कमीत कमी १० वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव असणे आवश्यक आहे. असे जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

विकास भवन येथे जागतिक ग्राहक दिन संपन्न

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : शासन व ग्राहक चळवळीतील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने विकास भवन येथे जागतिक ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या जागतिक ग्राहक दिनाचे उद्घाटन जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्ष वैशाली गजभिये यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर विवेक देशमुख, जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोग वर्धाचे सदस्य संजय मसंद, अनिल तोष्णीवाल, अखिल भारतीय ग्राहक पंचायत वर्धा चे अध्यक्ष सतिश देशमुख, अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा वर्धाचे जिल्हा संघटक किशोर मुटे, संघटक अनिल मिश्रा, सचिव विनोद पोटे, वर्धा तालुका अध्यक्ष सुरेश पट्टेवार, अखिल भारतीय ग्राहक कल्याण विदर्भ शाखाचे सचिव अजय भोयर, यांची उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमाला जिल्हा ग्राहक संरक्षण पंचायतचे सदस्य सचिव तथा प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी अजय साबळे, धान्य खरेदी अधिकारी चंद्रशेखर वानखेडे, निरिक्षण अधिकारी मनिषा माजरखेडे यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे संचालन सुस्मिता आखाडे यांनी केले .

आमदार परिणय फुके यांच्या निधीतून गुरुद्वारा समाज भवन - भूमिपूजन उत्साहात संपन्न

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा - भंडारा जिल्ह्यातील गुरुद्वारा गोविंद धाम, जमनी येथे महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आमदार परिणय फुके यांच्या स्थानिक विकास निधीअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या गुरुद्वारा समाज भवनाचे विधिवत भूमिपूजन माजी नगर परिषद उपाध्यक्ष रुबी चड्ढा यांच्या हस्ते संपन्न झाले.

गुरु गोविंद सिंग यांच्या कार्याचा प्रसार होण्यासाठी आणि पंजाबी समाजासाठी एक स्वतंत्र समाज भवन निर्माण व्हावे, या उद्देशाने भंडारा जिल्हा पंजाबी समाज अनेक दिवसांपासून मागणी करत होता. अखेर आमदार परिणय फुके यांच्या विकास निधीतून गुरुद्वारा समाज भवनाच्या पहिल्या टप्प्याचे काम लवकरच पूर्ण होणार आहे. याबद्दल भंडारा जिल्हा पंजाबी समाजाने समाधान व्यक्त करून आमदार परिणय फुके यांचे आभार मानले.

या भूमिपूजन सोहळ्याला गुरुद्वारा समाज भवन समितीचे अध्यक्ष सुनील चड्ढा, सचिव श्याम खुराना, तसेच समितीचे सदस्य नीरज कंबोज, राजपूत, रोमी मल्होत्रा, मुक्का ठकराल, प्रशांत पुरुषार्थी, मंदीप सिंग कोहली, सोमनाथ पावा, अनिल चोपडा, गोविंद ललत, ललित आनंद यांसह आशु गोंडाणे, प्रमोद साठवणे, शैलेश मेश्राम, शीला मल्होत्रा, मीना पावा, मदान, पुरुषार्थी, कनक, नीतू आनंद आदी मान्यवर उपस्थित होते.

ड्रोन करणार खाणींची पाहणी; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत घोषणा

चुकीचे काम करणाऱ्यांवर कारवाई; तहसिलदारांना दोषी धरणार

मुंबई ■ दिलीप येवले



मुंबई : राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उत्खनन सुरू असल्याचे आढळून येत असून, हा प्रकार टाळण्यासाठी आता ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी स्वामित्व भरण्यापेक्षाही अधिक प्रमाणात उत्खनन होत असून, यात अधिकाऱ्यांचाही सहभाग असल्याचे निदर्शनास आल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळात दिली.

ते म्हणाले, राज्यभर सर्वेक्षण करून सरकार अनधिकृत खाणकाम उघडकीस आणेल आणि कठोर कारवाई केली जाईल. विशेषतः पुणे, सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांमध्ये मोठ्या कंपन्यांनी अनधिकृत उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे.

राज्यात वाळू उपसा आणि त्याच्या पुरवठ्यावर मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याच्या तक्रारी आमदारांनी मांडल्या. महसूल विभागाने नवीन वाळू धोरण तयार केले असून, त्याद्वारे वाळू तस्करी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या जातील. तसेच, सामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात वाळू उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही बावनकुळे यांनी दिले.

ठाण्यातील स्मार्ट सिटी प्रकल्पातील गैरव्यवहार, खाणकाम व उत्खननाच्या संदर्भातील नियमबाह्य कामे आणि वाळू-खनिज धोरणाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्या उत्तरात

बावनकुळे म्हणाले, ठाणे स्मार्ट सिटी प्रकल्पात दोन कंत्राटदारांनी नियमानुसार परवानगी न घेता उत्खनन केल्याचे आढळले. संबंधित कंत्राटदारांना २८.८१ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. असा प्रकार पुन्हा होऊ नये यासाठी आता यापुढे एखादे काम करताना अगोदरच स्वामित्वाची रक्कम भरून घेतली जाईल. कोणालाही यामधून सुटका मिळणार नाही.

वाळू आणि खाणकामाच्या मुद्द्यावर आमदारांनी महसूल आणि गृह विभागाकडून अधिक कठोर कारवाईची मागणी केली. यावर मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, लवकरच नव्या धोरणाद्वारे अनधिकृत खाणकाम आणि वाळू चोरीवर अंकुश ठेवला जाईल. वाळूचा पुरवठा अधिक नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात येणार असून, त्यासाठी नवीन क्रशर उद्योगांना प्रोत्साहन दिले जाईल.

चर्चेदरम्यानचे अन्य महत्त्वाचे निर्णय वाळू उपसा आणि वितरण प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी शासन नवीन धोरण राबवणार. अनधिकृत खाणकाम करणाऱ्या कंपन्यांवर कठोर दंड आणि कारवाई होणार. महाराष्ट्रातील सर्वच विभागांमध्ये मोठ्या प्रकल्पांच्या खर्चाचे बारकाईने पुनरावलोकन करण्याचे आदेश. ङ महसूल विभागाने स्मार्ट सिटी आणि इतर विकास प्रकल्पांसाठी नियोजन करताना खाणकाम शुल्क आधीच अंतर्भूत करण्याचा निर्णय घेतला.

जिल्हा पोलिसांची गुन्हे आढावा बैठक करडी येथे - कायदा आणि सुव्यवस्थेवर विशेष भर

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा - जिल्हा पोलिसांकडे तपासावरील प्रलंबित गुन्हयांचा तसेच समोर येणाऱ्या धार्मीक उत्सवांचा आढावा घेवुन त्याकरीता बंदोबस्ताची आखणी करण्याकरीता जिल्हा पोलीसांकडुन दर महिन्याला जिल्हा मुख्यालयाचे ठिकाणी गुन्हे बैठक आयोजीत करण्यात येत असते या बैठकीचा उद्देश जिल्हयातील सर्व वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक आणि त्यांचेकडील प्रलंबित गुन्हयांचा आढावा तसेच त्यांचे उपविभाग, पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात असलेल्या कायदा व सुव्यवस्थेची माहीती वरीष्ठांना पुरवुन त्यांचेकडुन मार्गदर्शन प्राप्त करणे हा आहे.

जिल्हा पोलीसांची गुन्हे आढावा बैठक हि नेहमी जिल्हा मुख्यालयाचे ठिकाणीच आयोजीत केली जाते परंतु भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक नूरुल हसन यांच्या अभिनव संकल्पनेतुन भंडारा जिल्हा पोलीसांची गुन्हे आढावा बैठक जिल्हा मुख्यालयाबाहेर घेण्यात येत आहे. यापूर्वी नोव्हेंबर २०२४ ची गुन्हे आढावा बैठक महाराष्ट्र मध्यप्रदेश आंतरराज्य सिमेवरील गोबरवाही त्यानंतर जानेवारी/२०२५ ची गुन्हे आढावा बैठक अड्याळ येथे घेण्यात आली होती. तीच परंपरा कायम ठेवत दिनांक १९/०३/२०२५ रोजी फेब्रुवारी/२०२५ ची गुन्हे आढावा बैठक पोलीस स्टेशन करडी येथील भडके मंगल कार्यालयातील सभागृहात आली. या गुन्हे बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक नूरुल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे तसेच जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी आणि सर्व शाखा प्रमुख उपस्थित होते. जिल्हा पोलीस दलातील अधिकारी, अंमलदारांपैकी फेब्रुवारी/२०२४ मधे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ३१ पोलीस अधिकारी, अंमलदार, पोलीस पाटील तसेच मंत्रालयीन कर्मचारी यांना तसेच पोलीस दलास मदत करणाऱ्या नरसिंहटोलाचे पोलीस पाटील रामदास होकटु बोंद्रे, चिचखेडा येथील पोलीस पाटील अर्चना संतोष श्रीरामे यांचा त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्रशंसापत्र देवून सत्कार करण्यात आला. बैठकीमधे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडुन प्रलंबित गुन्हयांची माहीती घेवुन तपासा संबंधाने मार्गदर्शन करण्यात येवुन जिल्हयात लपुन छपुन सुरु असलेले सर्व प्रकारच्या अवैध धंद्यांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत पोलीस अधीक्षक नूरुल हसन यांनी जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे प्रमुखांना आदेश देण्यात आले.

गुन्हे आढावा बैठकीमधे बिजु गंवारे, सचिव, जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण भंडारा यांचे कडुन नविन फौजदारी कायद्याचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते त्यावेळी त्यांनी सर्व पोलीस अधिकाऱ्यांना नविन कायद्यासंबंधाने मार्गदर्शन केले त्याकरीता पोलीस अधीक्षक नूरुल हसन यांनी बिजु गंवारे, यांचे विशेष आभार व्यक्त केले. गुन्हे आढावा बैठकीनंतर पोलीस अधीक्षक नूरुल हसन यांनी करडी परीसरातील जनतेशी त्याच मंगल सभागृहामधे प्रत्यक्ष संवाद साधुन त्यांच्या अडी-अडचणी जाणून निराकरण केलेले आहे.

सरपंच पतीचा केज पंचायत समितीत आत्मदहन करण्याचा प्रयत्न! ; कामाचे बिल काढण्यासाठी पैशाची मागणी केल्यावरून संतप्त महिला सरपंच पतीचे कृत्य

केज ■ प्रतिनिधी



केजः केज तालुक्यातील डोका गावच्या सरपंच पतीचा केज पंचायत समितीत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला परंतु गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने व उपस्थित नागरिकांनी सरपंच पतीस आत्मदहन करण्यापासून रोखले. कामाचे बिल काढण्यासाठी पैशाची मागणी केल्यावरून संतप्त महिला सरपंच पतीने कृत्य केले असल्याचे उपस्थित नागरिकांतून चर्चा ऐकण्यास मिळाली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील डोका येथील ग्रामपंचायत कार्यालया अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, सांडपाण्याचे शोष खड्डे आणि सार्वजनिक स्वच्छता याचे बांधकाम इत्यादी कामाचे मोजमाप हे पुस्तिकेत नोंद घेऊन बिल काढण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी केज तालुक्यातील डोका येथील सरपंच पती ५० हजार रुपयाची मागणी केली असता त्यापैकी सरपंच पतीने २० हजार रुपये दिले होते. परंतु ३० हजार रुपये न दिल्यामुळे त्यांनी सदर कामाचे बिल काढले नाही, संतप्त झालेल्या सरपंच पतीने केज पंचायत समिती मध्ये आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

डोकं येतील महिला सरपंच कमल भांगे यांनी गावामध्ये घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी नियोजन व सार्वजनिक स्वच्छालय इत्यादी कामे पूर्ण होऊन देखील त्या कामाचे मोजमाप पुस्तके नोंद घेऊन केलेल्या कामाच्या बिलासाठी त्यांनी वेळोवेळी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे कागद पत्रानिशी मागणी करून पाठपुरावा केलेला आहे.

तरी देखील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता आंधळे, कनिष्ठ अभियंता चव्हाण व शाखा अभियंता श्रीमती वंदना साळवे या सर्वांनी सरपंच पती गोरख भांगे यांच्याकडे ५० हजार रुपयाची मागणी केली होती.

सरपंच यांनी मागणी केलेल्यापैकी २० हजार रुपये कार्यकारी अभियंता आंधळे यांना नगदी दिले असताना देखील अद्यापही त्यांनी वरील योजनेअंतर्गत गावात केलेल्या कामाचे बिल निघाले नाही. त्याचबरोबर सरपंच पती यांना उर्वरित राहिलेले ३० हजार रुपये देण्याची मागणी करण्यात आली जोपर्यंत उर्वरित राहिलेले पैसे देणार नाहीत तोपर्यंत बिल निघणार नाही अशी अरेरावीची भाषा संबंधित अधिकाऱ्यांनी केली व खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकीही त्यांना देण्यात आली होती.

दिनांक २० मार्च रोजी चार वाजण्याच्या सुमारास पंचायत समितीच्या इमारतीमध्ये सरपंच पती गोरख भांगे यांनी आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला

सरपंच पती गोरख भांगे हे पंचायत समिती कार्यालयामध्ये आत्मदहन करत असल्याची माहिती गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने यांना कळाले असतात त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन भांगे यांना आत्मदहन करण्यापासून प्रवृत्त केले व केज पोलिसांना फोन करून तात्काळ पंचायत समिती कार्यालयात पाचरण केले.

उप अभियंता श्रीमती साळवे या त्यांच्या कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या लोकप्रतिनिधी व नागरिकांना एकेरी व अर्वाच्य भाषेत बोलत असल्याच्या तक्रारी गटविकास अधिकारी यांच्याकडे अनेक लोकप्रतिनिधी व सरपंच यांनी तोंडी केलेल्या आहेत असे उपस्थित नागरिकांतून ऐकण्यास येत होते. सदर प्रकरणी वरिष्ठ अधिकारी काय निर्णय देतात याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

तळेगाव पोलिसांचा अवैध व्यवसायांवर धडाका – गुन्हेगारीवर ठोस कारवाई

तळेगाव ■ प्रतिनिधी



तळेगावः तळेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायांवर सुरू असलेल्या कठोर कारवाईमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. ठाणेदार मंगेश भोयर यांच्या नेतृत्वाखाली मागील सहा महिन्यांत पोलिसांनी अनेक महत्त्वपूर्ण कारवाया केल्या असून, चोरी, अवैध दारू विक्री, वाहन चोरी आणि वाळू तस्करीवर मोठा आळा घालण्यात आला आहे.

गुन्हेगारीविरुद्ध पोलिसांचा कठोर पवित्रा

चोरीचे गुन्हे लवकर उघड - जैन मंदिरातील दोन चोरीच्या गुन्ह्यांमध्ये तात्काळ तपास करत आरोपीला जेरबंद करण्यात आले.

वाहन चोरी प्रकरण उघड - वाहन चोरीच्या गुन्ह्याचा तपास करत एक गुन्हा उघडकीस आणण्यात आला.

दारू विक्रेत्यांवर कडक कारवाई - अवैध दारू विक्रीविरोधात मोठी मोहीम राबवण्यात आली. आतापर्यंत तब्बल २५० अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई करत ५० ते ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

श्रर्ई अंतर्गत कठोर कारवाई - एका सराईत गुन्हेगारावर श्रर्ई कायद्यांतर्गत कारवाई करून त्याला तुरुंगात पाठवण्यात आले आहे.

अवैध वाळू तस्करांमध्ये दहशतः

तळेगाव पोलिसांनी अवैध वाळू व्यवसायाविरोधातही निर्णायक पाऊल उचलले आहे. सातत्याने सुरू असलेल्या कारवाईमुळे वाळू तस्करांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. आतापर्यंत सहा ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहेत.

ठाणेदार मंगेश भोयर यांच्या कार्यकाळातील धडाकेबाज कामगिरीः

ठाणेदार मंगेश भोयर यांनी रुजू झाल्यापासून अवघ्या सहा महिन्यांतच अवैध धंद्यांवर जोरदार कारवाई करत गुन्हेगारीवर मोठा आळा घातला आहे. यामुळे तळेगाव परिसरात कायदा-सुव्यवस्था अधिक बळकट झाली असून, नागरिकांनी पोलिसांच्या या धडाकेबाज कार्यवाहीचे स्वागत केले आहे.

गुन्हेगारीवर कठोर कारवाई सुरूच राहणार!

तळेगाव पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, अवैध व्यवसाय व गुन्हेगारीला कुठलीही सवलत दिली जाणार नाही. पुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहील.

महसूल परिषदेअंतर्गत प्रशिक्षण संपन्न



भंडारा ■ प्रतिनिधी

भंडारा. : शासनाने निर्धारित केलेल्या सात कलमी कार्यक्रमाचे अनुषंगाने प्रशासकीय कार्यपद्धतीत गतिमानता आणण्याच्या दृष्टीने अधिकारी कर्मचारी यांना विविध कार्यपद्धती अवलंबण्याबाबत १९ व २० मार्च या दोन दिवसाच्या कालावधीत महसूल परिषद अंतर्गत प्रशिक्षण घेण्यात आले.

या प्रशिक्षणाचे उद्घाटनाला जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते ,निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, प्रशिक्षक कुंडेटकर उपस्थित होते.

महसूल परिषदेत सर्व तलाठी व मंडळ अधिकारी उपस्थित होते. महसूल विषयक बाबी जसे सातबारा, मृत्युपत्र, हिंदू वारसा कायदा, मुस्लिम वारसा कायदा ूम्वर प्रशिक्षण देण्यात आले. त्याचप्रमाणे ैंश्एि, बायोमेट्रिक ूर्ह्हिम बेस्ड याबाबतही माहिती देण्यात आली. प्रश्नोत्तराच्या वेळी बऱ्याच कर्मचाऱ्यांनी आपल्या शंका उपस्थित केल्या. त्यांचे निरसन करण्यात आले असून त्याबाबत मार्गदर्शनही करण्यात आले.

प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी सर्व कनिष्ठ लिपिक व वरिष्ठ लिपिकांना देखील महसूल नियम कायदे कार्यपद्धती विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

साहुर येथील स्मशानभूमीत उपयोगी वस्तूंची झाली तोडफोड



साहूर ■ शरद वरकड

आठ दिवसांपासून चौकशी न झाल्याने गावात संतापाचे वातावरण

साहुर : आष्टी तालुक्यातील साहुर हे गाव सर्कलचे असुन याठिकाणी दोन स्मशानभूमी आहे त्यापैकी एका स्मशानभूमीत धुलिवंदनाच्या दिवशी दारूच्या नशेत काही लोकांनी स्मशानभूमीत येऊन तेथील पाण्याची टाकी, नळाची पाईप लाईन, बसण्याचे टेबल, सौंदर्यीकरण स्टाईल, टीना इत्यादी साहित्य तोडफोड केल्याने गावातील सरपंच व इतर उमेदवारांनी आष्टी पोलिस स्टेशन येथे येऊन तक्रार दिली परंतु कुठल्याही प्रकारची चौकशी न झाल्याने दारूड्या लोकांची हिम्मत वाढुन उद्या ग्रामपंचायत तोडफोड होण्याची भीती निर्माण झाल्याचे मत येथील ग्रामपंचायतीच्या वतीने सांगण्यात आले यामध्ये ग्रामपंचायतचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून मोठी भिती निर्माण झालेली आहे हे विशेष

बोरगांव पुनर्वसन येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडाराः तालुक्यातील बोरगांव बुज पुनर्वसन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या सोहळ्यास गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत सदस्य व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांनी शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत आपले विचार व्यक्त केले. गावचे सरपंच संजय लांजेवार यांनी छत्रपतींच्या दूरदृष्टी व प्रशासन कौशल्यावर प्रकाश टाकला. पोलिस पाटील जगदीश लांजेवार यांनी युवांना प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. तसेच ग्रामपंचायत सदस्य अमोल खोब्रागडे, अनिता घोल्लर, मंदा पडोळे यांनी महिलांच्या सशक्तीकरणात शिवरायांचे योगदान अधोरेखित केले.

कार्यक्रमात विश्वनाथ हटवार (तंटामुक्त समिती अध्यक्ष), दिलीप ढगे, बाबूजी लंकेस्वर हटवार, सूर्यभान लांजेवार, तुषार बावनकुळे, सुनिल वरणकर, भूषण बावनकुळे, समीर वाघमारे, गौरव पडोळे, रशिकांत पडोळे, चेतन लांजेवार, आदित्य लांजेवार, आकाश खोब्रागडे, पंकज पडोळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिवाजी महाराजांच्या गाथेचे वाचन, प्रेरणादायी भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. संपूर्ण गावभर शिवजयंतीचा जयघोष घुमत होता. शेवटी ग्रामस्थांनी एकत्र येऊन महाराजांच्या विचारांचा अंगीकार करण्याचा निर्धार केला.

केज तहसीलकडून जागतिक चिमणी दिवस साजरा ; चिमण्यांना पाण्याची सोय ; झाडांना बांधले प्लास्टिक भांडे



केज ■ प्रतिनिधी

केजः केज येथील तहसील कार्यालयाकडून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्यात आला. नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी चिमण्यांना पिण्यासाठी पाणी भांडे व्यवस्था करून चिमणी दिवस साजरा केला

उन्हाळ्यात चिमण्यांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. चिमण्यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. चिमण्यांना वाचवण्यासाठी तहसील परिसरात असलेल्या झाडांना प्लास्टिकचे भांडे बांधून त्यामध्ये पाणी ठेवण्यात आले

यामुळे झाडावरच्या चिमण्यांना पाणी उपलब्ध झाले आहे हा उपक्रम सर्व नागरिकांनी हाती घेऊन आपापल्या परिसरात चिमण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करावी. पक्ष्यांना वाचवण्यासाठी कृतिशील उपक्रम राबवावेत असे आवाहन भंडारे यांनी केले.

काटोल येथे एक्स रे मोफत तपासणी शिबिर संपन्न



काटोल ■ प्रशांत पवार

काटोल : प्रा आ केंद्र कचारीसावंगा येथे संशयीत क्षयरुगण यांच्या चेस्ट एक्स रे तपासणीसाठी मोबाईल र्ह्म मा. जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.नागपुर मा. क्षयरोग अधिकारी नागपूर बुधवार दि १९/३/२०२५ ् प्रा आ केंद्रं कचारीसावंगा या ठिकाणी कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त संशयित क्षयरुग्ण यांचे म्पू ्ण तपासणी करण्यासाठी नियोजन करण्यात आले. या वेळी ऐकुन ५१ रुग्णांचे नागपूर तज्ञ टीम माफैत तसेच जागेवरचैं भ्काढण्यात आले मा. डॉ .शशांक व्यवहारे तालुका आरोग्य अधिकारी काटोल डॉ.कांदबरी ऊबरहंडे व डॉ.यासीम वैद्यकीय अधिकारी, प्रशांत वीरखरे,शुभम सोरते आरोग्य निरीक्षक ,यांची उपस्थिती होती या मोहिमे यशस्वी ते करिता आरोग्य सेवक/आरोग्य सेविका,क्षेत्रकार्यकर्ते ,वाहन चालक तसेच स्थानिक ग्रा.प., आशा यांनी सहकार्य केले.

दोन आठवड्यावरून आधीक खोकला, दोन आठवड्यावरून अधिक कालावधीचा ताप, वजनात घट, भूक न लागणे मानेवर गाठ येणे असे रुग्ण असल्यास त्यांनी दुर्लक्ष न करता आपला थुंकी नमुना तपासणीसाठी प्रा.आ.केंद्र कचारीसांवगा येथे देण्यात यावा दरम्यान आपला मोफत एक्स-रे काढून आपल्या तब्येतीचे निदान करून घ्यावे या बाबत आव्हान करन्यात आले. या करिता मोफत व्यवस्था असुन स्थानिक आरोग्य कर्मचारी यांचेशी संपर्क करन्याबाबत माहिती देण्यात आली.

राम सुतार यांच्या शिल्पांमधून राष्ट्रभक्ती, भव्यतेची प्रेरणा : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भावना

मुंबई ■ दिलीप येवले



मुंबई : शिल्पकार राम सुतार यांची शिल्पे ही अभूतपूर्व आहेत. या शिल्पांमधून त्यांची राष्ट्रभक्ती, इतिहासाची जाणीव आणि भव्यतेची प्रेरणा मिळते अशा भावना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.

शिल्पतपस्वी, पद्मभूषण राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली, असे सांगून बावनकुळे म्हणाले की, अतिशय आनंददायी घोषणा केली. त्याचा मनपूर्वक खूप आनंद झाला.

मला व जगाला ज्यांच्या शिल्पकौशल्याने मोहित केले आहे. वयाची शतकी वाटचाल करणारे राम सुतारजींचे प्रसंगोचित निरीक्षण, अनुभवसंपन्न आशय, शिल्प निर्मितीची त्यांच्या अलौकिक कलासाधनेपुढे मी नतमस्तक आहे. महायुती सरकारचा हा निर्णय कलारसिकांना आनंद देणारा असल्याचेही बावनकुळे यांनी म्हटले.

०१ एप्रिल पासून घरगुती विद्युत उपकरण सेवा उद्योजक प्रशिक्षण आयोजन ; रोजगाराची आवड असणाऱ्या युवक व युवतीनी संपर्क साधावा

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा, : भारत सरकार, महाराष्ट्र शासन एवं बैंक ऑफ इंडिया प्रायोजित स्टार स्वरोजगार प्रशिक्षण संस्था, भंडारा संस्थेद्वारा निशुल्क प्रशिक्षण कार्यक्रमाचे ०१ एप्रिल २०२५ पासून घरगुती विद्युत उपकरण सेवा उद्योजक ३० दिवसीय प्रशिक्षण सुरु होत आहे.

या प्रशिक्षणामध्ये विद्युत सुरक्षेच्या मूलभूत संकल्पना, वायरिंग प्रणाली, मल्टीमीटरचा वापर, विविध प्रकारच्या स्विचेस आणि सॉकेट्स, तसेच घरगुती वायरिंगसंबंधी संपूर्ण माहिती मिळेल. यासोबतच सिंगल फेज मोटर, पंखे, मिक्सर ग्राइंडर, गिझर, इंडक्शन हीटर, वॉशिंग मशीन, एअर कूलर आणि अन्य विद्युत उपकरणांची दुरुस्ती आणि देखभाल करण्याची प्रायोगिक कौशल्ये शिकवली जातील प्रशिक्षणादरम्यान मार्केट सर्वेक्षण, उद्योजकता कौशल्ये, व्यवसाय नियोजन, कर्ज आणि सरकारी योजनांची माहितीही दिली जाईल.

तसेच, यशस्वी उद्योजकांशी संवाद साधण्याची संधी मिळेल, जे तुम्हाला स्वयंरोजगाराच्या दिशेने मार्गदर्शन करतील, व्यावसायिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी ग्राहक व्यवस्थापन, विपणन तंत्र, व्यवसाय खर्च नियोजन आणि बँकिंगसंबंधी मूलभूत माहिती देखील या प्रशिक्षणाचा एक भाग असेल. संपूर्ण व्यवसायिक दृष्टीकोनासह तांत्रिक आणि उद्योजकीय कौशल्ये मिळवण्याची ही सुवर्णसंधी आहे. तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच नाव नोंदवाः।

प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना जेवण, चाय, नास्ता, वही, पुस्तके व राहण्याची आदी सोय मोफत केली जाईल, स्वयं रोजगाराची आवड, व्यवसाय करण्याची तयारी असणारे वय १८ ते ४५ वर्षे, शिक्षण दहावी पास किंवा नापास अशा पुरुष मंडळी नी मुलाखती करीत २४ मार्च २०२५ सकाळी १० वाजता बी, ओ, आय, स्टार स्वरोजगार प्रशिक्षण संथा लालबहादूर शात्री (मनरो) शाळेच्या बाजूला शास्त्री चौक भंडारा येथे उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे निर्देशक मिलिंद इंगळे यांनी कळविले आहे.

संत शिरोमणी गुरु रविदास सेवा संस्थेची आढावा बैठक-वर्धापन दिनाची जय्यत तयारी

भंडारा ■ प्रतिनिधी



भंडारा, २० मार्च २०२५ - श्री संत शिरोमणी गुरु रविदास जी महाराज विभागीय सेवा संस्थेची महत्त्वपूर्ण आढावा बैठक भंडारा विश्रामगृह येथे अध्यक्ष राजू खवसकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी कार्याध्यक्ष ?ड. राहुल बावणे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे भंडारा जिल्हाध्यक्ष नितीन वानखेडे यांच्यासह संस्थेचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेच्या एका वर्षाच्या यशस्वी वाटचालीनंतर मे २०२५ मध्ये वर्धापन दिन साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला. या निमित्ताने समाजातील कर्तृत्ववान स्त्री-पुरुष, समाजसेवक, पदाधिकारी तसेच शासकीय व निमशासकीय सेवेत कार्यरत आणि सेवानिवृत्त व्यक्तींचा गौरव करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

सभेच्या प्रारंभी लाखनी तालुका महिला अध्यक्ष स्वर्गीय गीता एकनाथ लांडगे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक मिनिट मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर संस्थेच्या भविष्यातील कार्ययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आणि खालील महत्त्वाचे ठराव बहुमताने संमत करण्यात आले–

संत शिरोमणी गुरु रविदास यांचे साहित्य महाराष्ट्र शालेय पाठ्यपुस्तकात समाविष्ट करावे यासाठी मुख्यमंत्री व संबंधित जिल्ह्यांतील संपर्क मंत्र्यांना निवेदन देण्याचा निर्णय.

नवीन आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना संस्थेत संधी उपलब्ध करून देण्याचा मानस.

संस्थेच्या वर्धापन दिन सोहळ्यासाठी प्रमुख अतिथींच्या नावांवर सखोल चर्चा.

बैठकीचे संचालन व प्रस्तावना सचिव श्वेता शिंगाडे यांनी केली, तर आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष संगीता डहाके यांनी व्यक्त केले. संस्थेच्या कार्यप्रणालीवर प्रकाश टाकताना अध्यक्ष राजू खवसकर यांनी संस्थेच्या आगामी योजनांची माहिती दिली.

या वेळी मौदा तालुका अध्यक्ष कुमार गायकवाड, लाखनी तालुका अध्यक्ष नरेश काटवले, भंडारा जिल्हा प्रभारी सुरज काठवले, किशोर बावणे, नितीन भागवते, पद्मा खवसकर, संगीता डहाके, सुरेखा शिंगाडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242